बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)


बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया अंक ०६ | बुधवार,दि.२० जानेवारी २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# अग्नीकांड;सरकार "दोषींच्या" पाठिशी

**भंडारा:** जिल्हा रूग्णालयातील अग्नितांडवानंतर सत्ता पक्षाकडून सांत्वना, सखोल चौकशी आणि दोषींना कठोर शिक्षा करण्यात येईल या आश्वासनांची ग्वाही दिली जात असतानाच विरोधकांकडून दोषींविरूद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होऊ लागली आहे. राज्याचे प्रमुख येऊनही कारवाईचे ठोस आदेश न दिल्यामुळे "सरकार"च दोषींना पाठीशी असल्यामुळेच अद्यापही एकावरही निलंबनाची कारवाई होऊ शकली नाही.यावरुन सरकार अग्नीकांडातील मृत बालकांच्या कुटुंबियांच्या भावनेशी खेळत आहे, असा आरोप आता होऊ लागला आहे. सरकारी यंत्रणा, मंत्री व अधिकाऱ्यांनी फोटो सेशनशिवाय काहीच केले नाही. अद्यापही चौकशी समितीनेही अहवाल सादर केला नाही. यावरून सरकार किती निष्काळजीपणे याकडे बघते हे दिसून येत आहे.



एखादा दोषी सुटला तरी चालेल परंतु, कुणा निदोषाला शिक्षा होऊ नये, असा सरकारचा हेतू असला तरी ही चूक मानवी असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ही चूक नेमकी कुणाची यावर अहवालाअंती शिक्कामोर्तब होईल. कुणावर तरी दोषरोपण सिद्ध करून त्यांना निलंबित करण्यात येईल. कारवाईने समस्या मिटणार नाही. निलंबनाने गेलेले जीव परत येणार नाही. त्यामुळे अशा घटना घडू नये, याची खबरदारी घेण्याचे आव्हान शासनकर्त्यांनी स्वीकारली पाहिजे. नाही तर पुन्हा कुठे तरी अशा घटना घडल्यावर सरकार पुन्हा जागे होईल आणि राजकारणी समित्या नेमत राहतील.

शनिवार ९ जानेवारी रोजी झालेल्या अग्निकांडात नवजात अति दक्षता कक्षातील १० नवजात बाळांचा मृत्यू झाला. वाचविण्यात आलेल्या ७ बाळांवर (सध्या वातावरण तापलेले असल्यामुळे) उत्तमप्रकारे उपचार सुरु आहेत. मात्र या ५ दिवसात एका गोष्टीकडे सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे. ९ पासून १३ जानेवारीपर्यंत जिल्हा सामान्य रुग्णालयात जन्माला आलेल्या ६४ बाळांकडे कुणाचे लक्ष आहे?; जन्माला आलेल्या ६५ बाळांपैकी एकाला नागपूर येथे हलविण्यात आले असून बाकी ६४ बाळ त्यांच्या आईजवळ सामान्य रुग्णालयातच आहेत. विशेष म्हणजे या ६४ बाळांपैकी कुणालाही SNCU मध्ये हलविण्याची परिस्थिती नसल्याचे सांगण्यात आले, घटनेपूर्वी या रुग्णालयात दररोज अनेक बाळांना SNCU मध्ये हलविण्यात येत होते. मात्र आता सर्वच बाळ हेल्दी आहेत ही सुद्धा या सामान्य रुग्णालयाची एक ;असामान्य; गोष्ट आहे.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मुलभूत गरजांची परिपूर्ती होणे हा विकासाचा मुख्य अजेंडा असला पाहिजे. परंतु त्यातून वलयांकित प्रतिमा निर्माण होत नाहीत. त्यामुळे राजकीय मंडळींना बांधकामाखेरीज विकासाची दुसरी व्याख्या दिसत नाही.

आज या घटनेनंतर आरोप-प्रत्यारोप करणाऱ्या एकातरी लोकप्रतिनिधीला या जिल्हा रूग्णालयातील कारभार कसा सुरू आहे? कोणत्या कक्षात कशाची गरज आहे? हे जाणून घेण्याची तसदी कधी वाटली नाही. एखाद्या कक्षात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था स्वत:कडून कुणी केल्याचे ऐकीवात नाही. त्यासाठीही त्यांना स्थानिक विकास निधीचा आधार घ्यावा लागतो, ही शोकांतिका आहे.

लोकप्रतिनिधी, शासकीय कमचाऱ्यांना मोफत, सवलतीच्या दरात आरोग्य सेवा दिली जाते. त्यामुळे हे सर्वचजण महागड्या रूग्णालयात उपचार घेतात. त्या खर्चाची प्रतिपूर्ती शासकीय तिजोरीतून केली जाते. २०१८-१९ या वर्षात २५० कोटी, २०१९-२० या वर्षात १८५ तर १ एप्रिल २०२० ते आतापर्यंत ८४ कोटी रूपये देण्यात आले आहे. हीच तत्परता भंडारा रूग्णालय प्रशासनाने १ कोटी ५२ लाख ४४ हजार ७८३ रूपयांच्या पाठविलेल्या प्रस्तावाबाबत दाखविली असती तर कदाचित हे अग्नितांडव घडले नसते.

रूग्णालय प्रशासनाने पाठविलेल्या प्रस्तावाकडे आरोग्य सचिवाने दुर्लक्ष केले असे गृहित धरले तर हा विभाग आरोग्य मंत्र्यांच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे या दोषाला जबाबदार कोण? असा प्रश्न आपसुकच निर्माण होतो. त्यामुळे आरोग्य विभागाच्या एखादा वरिष्ठ अधिकाऱ्यावर कारवाई झाली तर पर्यायाने ही जबाबदारी आरोग्य मंत्रालयावर येईल आणि ती येऊ नये, यासाठी कारवाईचा हा ससेमिरा सुरू राहील. शेवटी घटनेच्यावेळी कक्षात अनुपस्थित कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर हे खापर फोडून प्रकरण गुंडाळण्यात येईल.

आजचे विरोधक कालचे सत्ताधारी होते. त्यांच्याकडून फायर ऑडिटची मागणीही होऊ लागली आहे. फायर ऑडिट दर सहा महिन्यांनी केले पाहिजे असा नियम आहे. तसे असेलच तर मागील १० वर्षांपासून कितीवेळा फायर ऑडिट करण्यात आले. त्यात कधी त्रुटी काढण्यात आली का? त्याची कधीतरी परिपूर्ती करण्यात आली का? हे सारे प्रश्न अनुत्तरीत आहेत. सामान्य नागरीक म्हणून आम्ही कधी तरी लोकप्रतिनिधींकडून या सामान्य प्रश्नांची उकल केली का? याचे उत्तरही नाही, असेच असणार आहे, त्यामुळे या बालकांच्या मृत्यूचे मारेकरी आम्हीही असणार आहोतः

# सीईओंच्या आडकाठीमुळे भंडारा-गोंदिया जिल्ह्यात अनुकंपाधारक नोकरीपासून वंचित



**भंडारा:** भंडारा व गोंदिया जिल्हा परिषदेत गेल्या अनेक वर्षापासून अनुकंपा तत्वावरील पदे भरली न गेल्याने अनुकंपातत्वावर नोकरीसाठी पात्र असलेल्या अनेकांची वयोमर्यादा संपण्याची वेळ आली आहे. मात्र या दोन्ही जिल्हा परिषदेमधील अधिकारी या गोष्टीकडे कानाडोळा करुन बसल्याने अकुंपाधारकावर नोकरीपासून वंचित राहण्यची वेळ आली आहे.भंडारा जिल्ह्यातील १९८ व गोंदिया जिल्ह्यातील ७० अनुकंपा उमेदवार मागील १२-१३ वर्षापासून नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. ५ फेब्रुवारी २०२० च्या शासन निर्णयानुसार ४५ दिवसाच्या आत भरती प्रक्रीया राबवून शासनाला माहिती सादर करण्याचा निर्णय असतांना सुद्धा गोंदिया-भंडारा जिल्हा परिषदेच्या वतीने शासन निर्णयाला केराची टोपली दाखविण्यात आहे. त्यामुळे १८ जानेवारीपासून या अनुकंपा धारकांनी भंडारा जिल्हा परिषद कार्यालयासमोर मागणी पूर्ण होईपर्यत धरणे आंदोलनाला सुरूवात केली आहे.

भंडारा जिल्हा परिषदेत लवकर प्रलंबित अनुकंपा भरती करण्यात यावी यासाठी आंदोलन सुरु करण्यात आले आहे. तर गोंदिया जिल्ह्यात पात्र असलेल्या ७० अनुकंपा धारकांचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे यांच्या स्वाक्षरीसाठी अडकून आहेत. गोंदिया जिल्हा परिषदेत ४०० च्या जवळपास अनुकंपा धारकांची यादी असून त्यातील ७० जण पात्र ठरले असून तेवढ्या जागा विविध गटात उपलब्ध आहेत. शासनाने ही अनुकंपा तत्वावरील नोकरभरतीला हिरवा कंदील दाखविलेला आहे.

येत्या काही दिवसातच दोन्ही जिल्ह्यात परत जिल्हा परिषद, पंचायत समितीची आचारसंहिता लागण्याची शक्यता असून त्यापुर्वी या नियुक्त्या व्हाव्यात अशी अनुकंपाधारकांची मागणी आहे.

गोंदिया जिल्ह्यात अनुकंपाधारकाकडे काही दलाल पोहोचून ५० हजार रुपयाची मागणी करीत असल्याची चर्चा सुरु झाली आहे. त्यामुळे सत्त-ाधारी महाविकासा आघाडी सरकारविरुद्ध अनुकंपधरकात रोष दिसून येत आहे. भंडारा येथील अनुकंपाधारकांच्या आंदोलनाची दखल घेत आमदार परिणय फुके यांनी आंदोलकांची भेट घेत जिल्हाधिकारी यांना तत्काळ प्रश्न निकाली लावण्याची विनंती केली.

यावेळी गिरीश सोमनाथे, मंगेश माकडे अध्यक्ष, चेतन सेलोकर, जितेंद्र कांबळे, उमेश डोंगरवार, सचिन भोयर, दीपक ढेंगे, पुष्कर पटले, महेश मस्के, विद्याधर डुंबरे, राजकुमार टेकाम, श्रीकांत गभने जिल्हा परिषद गटनेता अरविंद भलाधरे, तीलकजी वैद्य अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा भंडारा , बबलुजी आतीलकर, उपस्थित होते.

# गोंदिया आगाराला कॅन्टीनची प्रतीक्षा

**गोंदिया :** राज्य परिवहन महामंडळाच्या गोंदिया आगारात मागील २१ वर्षापासून कॅन्टीनची सुविधा नाही. त्यामुळे प्रवाशांसह बसस्थानकात कार्यरत कर्मचाऱ्यांना मोठाच त्रास होत आहे. अनेकदा निविदा काढूनही एसटीला कॅन्टीन चालविण्यासाठी कंत्राटदार मिळाला नाही.

राज्यात शेकडोच्या संख्येने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बसस्थानक व आगार आहेत. जेथे प्रवाशांना व कर्मचाऱ्यांना नास्ता व भोजन करण्यासाठी कॅन्टीनची सुविधा उपलब्ध आहे. परंतु, मागील अनेक वर्षांपासून गोंदिया आगारात कॅन्टीन नाही. तसेच बुक्स स्टॉल व इतर सुविधासुद्धा नसल्यामुळे प्रवाशांसह अधिकारी कर्मचाऱ्यांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. १९७४ मध्ये गोंदिया आगाराची सुरुवात झाली. त्यावेळी बुक्स स्टॉल, कॅन्टीन व फळांचे दुकान होते. परंतु, एसटीने मिळणाऱ्या आवकपेक्षा अधिक भाडे वाढविल्यामुळे मागील २१ वर्षांपासून कॅन्टीनसाठी कंत्राटदार मिळत नाही. दरदिवशी सकाळपासून रात्रीपर्यंत गोंदियाच्या मुख्य बसस्थानकावर हजारो प्रवाशांची ये-जा होते. जवळपास ३०० अधिकारी, कर्मचारी आग-ारामध्ये कार्यरत आहेत. त्या सर्वांना जर चहा पिण्याचे असले तरी त्यांना आगाराच्या बाहेर जावे लागते. तसेच कर्मचारी जेव्हा चहा पिण्यासाठी बाहेर जातात, त्यात त्यांचा अधिक वेळ व्यर्थ जातो. प्रवाशांनासुद्धा मोठाच त्रास सहन करावा लागतो. मिळालेल्या माहितीनुसार, गोंदिया आगारात कॅन्टीनद्वारे मिळणाऱ्या संभावित उत्पन्नापेक्षा अधिक एसटीच्या भाड्याचे दर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे अनेकदा ई-टेंडरिंग केल्यानंतरही कॅन्टीनसाठी कंत्राटदार एसटीला मिळत नाही. याबाबद गोंदिया आगार व्यवस्थापक संजना पटले यांनी, आगारात कॅन्टीन सुरू करण्याचा निर्णय वरिष्ठ स्तरावरून घेतला जातो. कॅन्टीनबाबद पत्र व्यवहार करून वरिष्ठांना कळविण्यात आले आहे. वरिष्ठस्तरावर निर्णय घेण्यात आला तर नक्कीच कॅन्टीन सुरूहोऊ शकेल, असे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यात १३,७०३ रुग्णांची कोरोनावर

**गोंदिया-** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून १९ जानेवारी रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे १६ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. १७ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना सुट्टी देण्यात आली. आजपर्यंत १४,०५३ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. १३,७०३ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या १६९ आहे. ७७ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील १८१ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९६.८५ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२० टक्के आहे तर डब्लिंग रेट २२६.४ दिवस आहे.

# शीतगृहासाठी मृतदेहाचा ३० किमी प्रवास, ग्रामीण रूग्णालयात शीतगृहाचा अभाव

**सडक अर्जुनी :** येथील ग्रामीण रूग्णालयात मृतदेहाची उत्तरीय तपासणी केली जाते. परंतु, अज्ञात मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी ठेवण्यात येणारे शीतगृहच या ग्रामीण रूग्णालयात उपलब्ध नाही. त्यामुळे ३० किलोमीटर दूर असलेल्या देवरी ग्रामीण रूग्णालयात अज्ञात मृतदेहांना उत्तरीय तपासणीसाठी नेले जाते.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर २४ तास वाहनांची ये-जा सुरू असते. त्यामुळे या मार्गावर नेहमीच अपघात घडतात. अनेक अपघातात मृत्यू झालेल्यांची ओळखही पटत नाही. अश्यावेळी अज्ञात मृतदेहांची उत्तरीय तपासणी करून त्यांची ओळख पटविण्यासाठी शीतगृहात दोन ते तीन दिवसपर्यंत ठेवावे लागते. सडक अर्जुनीतील ग्रामीण रूग्णालय या मार्गावर असल्यामुळे तेथे शीतगृहाची व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, प्रशासनाने या रूग्णालयात उत्तरीय तपासणीची व्यवस्था तर केली आहे. परंतु शीतगृहाची



व्यवस्था करण्याचा विसर संबंधित प्रशास-नाला पडला आहे. त्यामुळे ३० किमी दूर अंतरावर देवरी ग्रामीण रूग्णालयात मृतदेहांना नेवून शीतगृहात ठेवले जात आहे. शीतगृहाची व्यवस्था नसल्यामुळे डुग्गीपार पोलिसांना त्या मृतदेहाला ३० किमी दूर अंतरावर असलेल्या देवरी ग्रामीण रूग्णालयात जाऊन तेथील शीतगृहात मृतदेहाला ठेवावे लागते.

# कवी यशवंत मनोहर यांनी जीवनव्रती नाकारला

नागपूर-विदर्भ साहित्य संघाच्या ९८ व्या वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा मानाचा ङ्गजीवनव्रतीफ पुरस्कार प्रसिद्ध कवी व विचारवंत यशवंत मनोहर यांनी ऐन वेळी नाकारला. पुरस्कार वितरण समारंभात सरस्वतीची प्रतिमा ठेवू नये. त्याऐवजी सावित्रीबाई फुले, फातिमा शेख किंवा ताराबाई शिंदे यांची प्रतिमा ठेवावी, अशी विनंती त्यांनी विदर्भ साहित्य संघाला केली होती; परंतु विदर्भ साहित्य संघाने या विनंतीला प्रतिसाद न दिल्याने त्यांनी हा पुरस्कार नाकारण्याचा निर्णय घेतला.विदर्भ साहित्य संघातर्फे मराठी साहित्यविश्वात आपली वेगळी छाप उमटवणाऱ्या विदर्भातील साहित्यिकाला कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या नावाने ङ्गजीवनव्रतीफहा पुरस्कार दिला जातो. यंदा हा पुरस्कार प्रसिद्ध विचारवंत व आंबेडकरी साहित्यिक यशवंत मनोहर यांना याआधीच जाहीर झाला होता. आज १४ जानेवारी रोजी विदर्भ साहित्य संघाच्या ९८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार यशवंत मनोहर यांना प्रदान करण्यात येणार होता; परंतु या कार्यक्रमात सरस्व-तीची प्रतिमा ठेवणार असल्याचे कळल्यावर त्यांनी विदर्भ साहित्य संघाच्या पदाधिकाऱ्याला संदेश पाठवून सरस्वतीची प्रतिमा न ठेवण्याची विनंती केली.

# बिरसी विमानतळातील सुरक्षा रक्षकांचे धरणे आंदोलन

**गोंदिया :** सन २००७ पासून बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाला सुरुवात झाली. तेव्हापासून स्थानिक नागरिक तेथे सुरक्षा रक्षक महणून कार्यरत आहेत. त्यांच्या सेवेला १३ वर्षांपेक्षा अधिक काळ झाला आहे. मात्र, सुरक्षा रक्षकांची कोणतीही चूक नसताना विमानतळ प्रकल्पाने या सर्वांना अचानक कमावरून बंद केले. त्याबाबत त्यांना कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस देण्यात आले नाही. हा आपल्यावर झा-लेला अन्याय असून १९ जानेव-ारीपासून बिरसी विमानतळासमोर धरणे आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे.





सन २००७ मध्ये बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या वेळी स्थानिक नागरिकांना या प्रकल्पातील रोजगारात सामावून घेण्यात येईल, असे लेखी आश्वासन विमानतळ तथा जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्थानिक नागरिकांना देण्यात आले होते. त्यानुसार परिसरातील युवकांना सुरक्षा रक्षक म्हणून कामावर घेण्यात आले. आज त्यांच्या से-वेला तब्बल १३ वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला. अशात त्यांना कोणतीही सूचना न देता विमानतळ प्रकल्पाने कमावरुन पूर्णता: बंद केले. त्यामुळे या सुरक्षा रक्षकांच्या कुटुंबांवर उपासमारीची पाळी आली आहे.

आपल्या देशात डीजीआर परिपत्रक १९९४ नुसार केंद्र शासनाच्या प्रकल्पात ९० टक्के एक्स सर्विस मॅन सुरक्षा रक्षक म्हणून असणे आवश्यक आहे. असे असतानाही वर्ष २००७ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी व जिल्हा प्रशासनाने याची माहिती स्थानिक जन-तेला दिली नाही. आता डीजीआरचा उपयोग करीत सर्व सुरक्षा रक्षकांना कमावरून बंद केले आहे. जर १९९४ पासून डीजीआर अस्तित्वात आहे तर मग २००७ मध्ये या प्रकल्पात स्थानिक नागरिकांना कामावर का घेण्यात आले? असा प्रश्नसुद्धा या सुरक्षा रक्षकांनी उपस्थित केला आहे. स्थानिक नागरिकांना केवळ भुलथापा देण्यासाठी तर विमानतळ अधिकाऱ्यांनी माहिती दडवून ठेवली नाही, असा आरोपही या सुरक्षा रक्षकांनी केला आहे. आता त्यांच्या सेवेला १३ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला, अर्ध्यापेक्षा जास्त वय या सेवेत निघून गेले आणि आता उतरत्या वयात यांना कोण रोजगार देईल, असा सवालही या सुरक्षा रखकांनी उपस्थित केला आहे

या प्रकल्पात बिरसी, कामठा, झिलमिली व परसवाडा येथील शेतजमिनी व घरे अधिग्रहीत करण्यात आली. परंतु, वास्तविक या प्रकल्पग्रस्त गावातील नागरिकांना प्रकल्पात रोजगार उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे प्रकल्पबाधित गावकऱ्यांवर मोठा अन्याय झाल्याची माहिती पत्र परिषदेत देण्यात आली.

आपल्याला न्याय मिळवा म्हणून या सुरक्षा रक्षकांनी विमानतळ प्रशासन, जिल्हा प्रशासन, केंद्र शासन, राज्य शासन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना अनेकदा निवेदन दिले आहे. खासदार सु-नील मेंढे यांनाही साकडे घातले आहे. परंतु, सर्वांनी अन्यायग्रस्त सुरक्षा रक्षकांच्या मागणीकडे डोळेझाक केले आहे. विमानतळ व जिल्हा प्रशासन स्थानिक नागरिकांवर मोठा अन्याय करीत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक धास्तावलेले आहेत.

सदर विमानतळ प्रकल्पाने परिसरातील नागरिकांच्या शेतजमिनी हिरावून नागरिकांना देशोधडीला लावले आहे. त्यामुळे आपले भविष्य वाचविण्यासाठी सर्व सुरक्षा रक्षक मंगळवार, १९ जानेवारीपासून आपल्या कुटुंबासह बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. तसेच सदर विमानतळ प्रकल्प चारही प्रकल्पबाधित गावांवर अन्याय करीत आहे. त्यामुळे बिरसी, कामठा, झिलमिली व परसवाडा या गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहनही आंदोलकांनी केले.

आंदोलनात विशाल सुरक्षा मजूर संघटनेचे अध्यक्ष अनिल भेंडारकर, सचिव पंकज वंजारी, उपाध्यक्ष बसंत मेश्राम, कार्यवाहक सतीश जगणे, ऋषीमुनी पटले, लोकचंद मुंडेले, रामेश्वर चौधरी, गोविंद तावाडे, अनिल मंदरेले, मंगलेश मुंडेले, दिगंबर मेश्राम, सदाशिव पाथोडे आणि सर्व सुरक्षा रक्षक सहभागी झाले आहेत.

# नोकरी जाण्याच्या भीतीने आला हार्टअटॅक

**गोंदिया :** गेल्या दहा ते बारा वर्षांपासून कंत्राटी कर्मचारी म्हणून सेवा दिली. आता शासन सगळ्या पदांचे ङ्गआऊटसोर्सिंगफ करीत आहे. त्यामुळे आपली नोकरी जाणार, या विवंचनेत गोंदिया जिल्हा परिषदेतील स्वच्छ भारत मिशन कक्षात कार्यरत कंत्राटी कर्मचारी देवानंद बोपचे (वय ४१) यांचे शुक्रवारी, दि.१५ जानेवारी रोजी हृदयविकरच्या तीव्र झटक्याने निधन झाले. घरी तथा गावातील मित्रांकडे तो सारखा फेब्रुवारी महिन्यात नोकरी जाण्याविषयी बोलत असल्याचे पत्नी रेखा बोपचे आणि भाऊ प्रकाश बोपचे यांचे म्हणणे आहे.



शासनाने कंत्राटी कर्मचाऱ्यांची भर्ती केल्यानंतर साधारणतः १६ ते १७ वर्षांपासून विविध विभागात कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या कंत्राटी कर्मचाऱ्यांची शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी आहे. मात्र, शासनस्तरावरून कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याऐवजी त्याचे पद बाह्यसंस्थेच्या माध्यमातून भरण्याचा घाट घालण्यात आलेला आहे. जुलै महिन्यात शासनस्तरावरून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन आणि तालुकास्तरावरील गट संसाधन केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे पत्र काढण्यात आले. कंत्राटी कर्मचारी या विरो-धात न्यायालयात गेले. राज्यातील विविध मंत्री व आमदारांना याविषयी निवेदने देण्यात आली. त्यामुळे शासनाने तात्पुरत्या स्वरुपात जुलै महिन्यातील पत्राला स्थगिती दिली. मात्र, जलजीवन मिशन अंतर्गत नवीन पदांना मंजूरी दिल्यानंतर सर्व पदे बाध्यसंस्थेच्या माध्यमातून भरण्याचे शासनाचे पत्र आले. शिवाय गेल्या १६ ते १७ वर्षांपासून कार्यरत पदांना व्यपगत करण्याचा सुद्धा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आपले पद जाणार, मुलांच्या शिक्षणाचे काय होईल. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाने सर्व भरती प्रक्रिया बंद केली. नव्याने नोकरी कुठून शोधणार. आता वयाचा एक उंबरठा पार पडला. त्यामुळे शासकीय नोकरीतून "एजबार' झाल्याने आपले कुटुंब उघड्यावर येईल. अशा विवंचनेत देवानंद बोपचे होता. अनेक मित्रांकडे माझी नोकरी जाणार असल्याचेच बोलत असल्याचे त्यांच्या मित्रांचे व गावकऱ्यांचे म्हणणे आहे. एका कंत्राटी सहकारी मित्राच्या अच-ानक झालेल्या निधनामुळे संपूर्ण राज्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांत रोष व्यक्त करण्यात येत आहे.

उल्लेखनीय म्हणजे, कंत्राटी कर्मचारी अत्यंत तुटपुंज्या वेतनावर कार्यरत आहेत. त्यातच त्यांच्या सुरक्षितेसाठी शासनस्तरावर कोणतेच पाऊल उचलले जात नाही. त्यामुळे देवानंद बोपचे यांच्या अकाली निधनामुळे त्याचे दोन चिमुकली मुले आणि पत्नी उघड्यावर आली असून त्यांच्या जीवनयापनाचा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे.

**कर्मचाऱ्यांत असा भेद का?**

पदभरती करण्यात येत नसल्यामुळे अनेक होतकरू तरुण कंत्राटी पदावर नोकरीला तयार होतात. त्यांना अल्प मानधन दिले जाते. कामाचा प्रचंड व्याप, नोकरीतील असुरक्षितता, वरिष्ठांची मर्जी सांभाळणे, नोकरी गेल्यास भविष्यातील निर्वाहाची समस्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पाचवीलाच पूजलेली आहे. विशेष म्हणजे, शासनाने १४ जानेवारीला एक परिपत्रक काढून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात वाढ केली.

तर दुसरीकडे कायम करण्याची मागणी करण्यात येणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पद व्यपगत करून त्यांना बाह्यसंस्थेच्या माध्यमातून घेण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचे वेतन अर्ध्यावर येईल. शिवाय नोकरी सुद्धा बेभरोशाची राहणार आहे. आपल्याच दोन कर्मचाऱ्यांत असा भेद का करण्यात येत आहे, असा सवाल कंत्राटी कर्मचाऱ्यांत व्यक्त केला जात आहे.

## संपादकीय

### चिमुकल्यांच्या हत्येनंतरही सरकार निद्रिस्त!

भंडारा जिल्हा रुग्णालयात दहा नवजात बालकांचा आयसीयूमध्ये आगीत होरपळून आणि धुराने घुसमटून मृत्यू झाला तरी राज्यकर्त्यांची आणि प्रशासनातील अधिका–यांची झोप उडालेली नाही. झाले ते अतिशय दु:खदायक आहे, असे पुन्हा होणार नाही, होताच कामा नये, अशी आश्वासने देणे सोपे आहे, पण तेच तेच ऐकून लोक कंटाळले आहेत. सरकारवर एवढ्या संवेदनशील घटनेचा काहीच परिणाम होत नसेल, तर दाद तरी कोणाकडे मागायची?

दुर्दैवी आईच्या स्तनात दूध भरेल, तेव्हा प्यायला तिचे पोटचे लेकरू नसेल. बापाला आपल्या पोराचा मुका घ्यावासा वाटेल, तेव्हा त्याचे लाडके बाळ त्याच्या जवळ नसेल. त्या चिमुकल्यांच्या अंगावर घालायला अजून कपडेही नव्हते. नुकतीच बाळुत्यात गुंडाळलेली ती नवजात बाळे होती. त्या आई–बापाचे दु:ख मोजण्यासाठी अजून मोजपट्टीही निघालेली नाही. आपल्या आईच्या उदरात नऊ महिने काढलेल्या व जन्माला आलेल्या या बाळांना जगही बघायला मिळालेले नाही. आगीच्या लोळांनी आणि प्रचंड धुराने त्यांचा बळी घेतला, तेव्हा त्या चिमुकल्यांचा टाहो रुग्णालयात कोणाला ऐकूही गेला नाही. लागलेली आग पाण्याने विझवली, पण माता–पित्याच्या हृदयाला लागलेली आग कशी विझवता येईल? त्या बाळांच्या माता–पित्यांना नुकसानभरपाई म्हणून सरकारने पाच लाख रुपये दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दु:ख व्यक्त करून त्या बाळांच्या आई–वडिलांना दोन लाख रुपये पाठवले. पण हे पैसे पाठवून ती बाळे कशी परत मिळणार? कोणाच्या चुकीमुळे त्यांचा मृत्यू झाला? कोणाच्या हलगजीपणामुळे दहा नवजात बालकांना डोळे उघडण्यापूर्वीच या जगातून कायमचा निरोप घ्यावा लागला?

लोकांचा प्रक्षोभ शांत करण्यासाठी सरकार नेहमीच चौकशीचा खेळ चालू ठेवते. दोषींची गय केली जाणार नाही, कितीही उच्चपदस्थ असला तरी कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले जाते. आजवर झालेल्या चौकशांचे पुढे काय झाले?

भंडारा जिल्हा सर्वसाधारण रुग्णालयाला सन १९८१ पासून फायर ब्रिगेडचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) नाही. तरीही गेली चाळीस वर्षे हे सरकारी इस्पितळ विना एनओसी चालू आहे. सन २०१५ मध्ये या इस्पितळाचा विस्तार करण्यात आला. सिक न्यू बॉर्न केअर युनिट (नवजात बालकांसाठी दक्षता विभाग), मेडिकल स्टोअर्स व कुपोषित मुलांसाठी उपचार कक्ष सुरू करण्यात आले. दुस–या वेळीही भंडारा नगर परिषदेकडून या इस्पितळाने ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेतलेले नाही. सर्वात कहर म्हणजे सार्वजनिक बांधकाम खात्याने इस्पितळाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यावर ऑक्युपेशन सर्टिफिकेट (ओसी) नसताना सार्वजनिक आरोग्य खात्याकडे सुपूर्द केली. २०१५ सालापासून एकदाच फायर ड्रिल झाल्याची माहिती पुढे आली आहे. कायकल्प योजनेखाली २०१६–१७ मध्ये फायर ड्रिलच्या नावाखाली सराव झाला. सुरक्षितता, स्वच्छता, प्रदूषणमुक्त वातावरणाला प्रोत्साहन म्हणून या इस्पितळाला नॅशनल हेल्थ मिशनतर्फे पुरस्कारही देण्यात आला. ज्या सरकारी इस्पितळाला फायर ब्रिगेडची एनओसी नाही, नगर परिषदेची ओसी नाही, कधी इलेक्ट्रिकल ऑडिट झालेले नाही, त्याला आग प्रतिबंधासाठी उत्तम सराव केला म्हणून सरकारच्या यंत्रणेने पुरस्कार द्यावा हे सर्व गौडबंगाल आहे. सर्वच प्रशासकीय यंत्रणा एकमेकांशी कसे वागतात, त्याचा हा नमुना आहे.

आरोग्य संचालक डॉ. साधना तावडे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सहा सदस्यांच्या उच्चस्तरीय समितीकडून भंडारा बाल हत्याकांडाची सर्वकष चौकशी करण्यात येत आहे. या समितीत आरोग्य विभागाचे तसेच फायर ब्रिगेडचे वरिष्ठ अधिकारी आहेत तसेच इलेक्ट्रिकल इंजिनीअर्सही आहेत. मरण पावलेल्यांमध्ये तीन बाळांचा मृत्यू आगीच्या ज्वाळांनी भाजून झाला, तर सात बालकांचा मृत्यू धुराने घुसमटून झाला. या नवजात मुलांचे वजन पाचशे ग्रॅम ते दीड किलोपर्यंत होते.

भंडारा जिल्हा रुग्णालयाची चार मजली इमारत असून तेथे चारशे बेड्स आहेत. गेल्या वर्षी कोरोनाग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी तिनशे बेड्सची अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात भंडारा जिल्हा आरोग्य अधिका–याने भंडार नगर परिषदेला पत्र लिहून फायर ऑडिट करून घेण्याची

विनंती केली होती. त्यापूर्वीही २०१८ मध्ये अशीच विनंती पत्र लिहून केली होती. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये नॅशनल हेल्थ मिशनचे संचालक एन. रामस्वामी यांनी सर्व जिल्ह्यांना पत्र पाठवून शासकीय इस्पितळांचे फायर ऑडिट करून घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. गेल्या वर्षी मे महिन्यात भंडारा इस्पितळात विद्युतीकरणाचे

नूतनीकरण, नवीन उपकरणे याविषयी एक सविस्तर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला पाठवला होता. तो अद्याप प्रलंबित आहे. भंडारा आग दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री, गृहमंत्री, आरोग्यमंत्री, पालकमंत्री, अशा व्हीआयपींची तेथे भेट द्यायला रांग लागली. राष्ट्रपती, पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांनी शोक व्यक्त केल्यावर राज्याची प्रशासकीय यंत्रणा हालली.

गेल्या वर्षभरात आरोग्य यंत्रणा कोरोनावर मात करण्यात गुंतली होती, त्याचा परिणाम अन्य रुग्णांकडे दुर्लक्ष झाले. रुग्णालयातील ढिसाळ कारभार, अस्वच्छता, बेशिस्त, कर्मचा–यांची अरेरावी, रुग्णांकडे दुर्लक्ष, हेळसांड, अनागोंदी कारभार यावर कोणाचा वचक नाही. सुरक्षा नियमावलीनुसार इस्पितळात पुरेशी साधनसामग्री आहे की नाही याकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ नाही आणि वरिष्ठांना त्याची फिकीर नाही.

वर्षातून दोन वेळा फायर ऑडिट झाले पाहिजे, पण तसे झालेच नाही. शॉर्टसर्किटमुळेच आग लागली का, ऑक्सिजन सिलिंडर सुरक्षित होते का, वातानुकूलित यंत्रणा व्यवस्थित होती का, ज्या वेळी आग लागली तेव्हा ड्युटीवर असणारे डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्ड बॉईज, कर्मचारी कुठे होते, आग रात्री २ वाजता लागली तेव्हा ते सारे झोपलेले होते हे खरे काय? गेल्या वर्षी मे महिन्यात जिल्हा प्रशासनाने इस्पितळात नूतनीकरण, दुरुस्ती व उपकरणासाठी दीड कोटी खर्चाचा प्रस्ताव पाठवला होता, तो कोरोनाच्या काळात पडून राहिला. मागणी करूनही इस्पितळाला सरकारने निधी दिला नाही. मंजूर पदापेक्षा किती तरी कर्मचारी येथे कमी आहेत, हा आणखी वेगळा मुद्दा आहेच. प्रशासनाची अनास्था, कर्मचा–यांचा हलगजीपणा व राज्यकर्त्यांची उदासीनता याचा परिणाम दहा चिमुकल्यांना होरपळून जीव गमवावा लागला.

### ग्रा.प. पाथरी येथे १४ व्या वित्त आयोग निधीची अफरातफर

**सालेकसा:** तालुक्यातील ग्राम पंचायत पाथरी येथील सरपंच आणि ग्रामसेवक यांनी आपसात संगनमत करून सन २०१८–१९ च्या १४ व्या वित्त आयोगातील निधीतून साहित्य खरेदी करतानी मोठ्या प्रमाणात अफरातफरी करण्यात आले, असा आरोप राजकुमार नागपुरे, राजेश दसरिया, फुलसिंग नागपुरे, दिलीप नागपुरे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला आहे.

प्रकरणाची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया, खंडविकास अधिकारी पंचायत समिति सालेकसा यांच्याकडे केले आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या आधारावर चौदाव्या वित्त आयोगातून जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाच्या वतीने सदर निधी ग्राम पंचायतींच्या खात्यावर वळती करण्यात येते निधीचे वितरण लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या आधारावर होत असते. त्यामुळे जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना जास्त अनुदान मिळते आहे. वित्त आयोगाच्या निधीवर आता जिल्हा परिषदेचा हस्तक्षेप राहिलेला नाही. हा निधी कसा आणि कुठे खर्च करावा याचे अधिकार आता ग्रामपंचायतीला देण्यात आले आहे.

त्यामुळे सालेकसा तालुक्यातील ग्राम पंचायत पाथरी येथील सरपंच आणि ग्रामसेवकाने कमी साहित्य खरेदी केले आणि अधिक साहित्याचे बिले जोडून शासकीय निधीची अफरातफरी केली असा आरोप आहे. ५ नोव्हेंबर २०१८ रोजी २४ नग स्टील थ्री सीटर सोफा कीमत एक लाख रुपये, व २७/११ रोजी ६ नग थ्री सीटर सोफा कीमत २५ हजार रुपये मध्ये खरेदी केल्याचे बिल जोडले आहे. मात्र गावात फक्त १० नग

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# गंगाबाई रुग्णालयात बालकांची सुरक्षा धोक्यात

**गोंदिया:** भंडारा येथील बाल रुग्णालयात दहा बालकांचा होरपळून मृत्यू झाला. अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावणारी घटना आहे. गोंदिया शहरातील बाई गंगाबाई रुग्णालयात भंडारापेक्षाही मोठे म्हणजे ३० बालरुग्ण क्षमतेचे अतिदक्षता कक्ष आहे. या ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक म्हणजे ३५ ते ४० बालकांवर उपचार करण्यात येतो. परंतु या ठिकाणी शॉर्ट सर्किट होण्याला वाव आहे. मात्र पाणी, एक्झिट द्वार नसल्याने अशी घटना घडल्यास त्याला कर्मचारी जवाबदार राहणार की प्रशासकीय यंत्रणा? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

बाई गंगाबाई रुग्णालयात दिवसाला वीस ते पंचवीसे प्रसृती होतात. जिल्ह्यासह मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि गडचिरोली, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील महिल प्रसुतीकरिता येतात. त्याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसुतीकरिता होणाऱ्या मातांची गर्दी असते. हे रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात आले. या रुग्णालयात अत्याधुनिक सोयी–सुविधांची युक्त असे बालकांकरिता अतिदक्षता विभाग आहे. या ठिकाणी नवजात बालकांचा उपचाराकरिता ठेवण्यात येते. या ठिकाणी ३० बालकांची क्षमता आहे. मात्र ३५ ते ४० बालकांचा उपचार करण्यात येते. मात्र इमारत जुनी आहे. अतिदक्षता विभागात आग लागल्यास ती विझविण्याकरिता अग्नीशमन बंब बसविण्यात आले आहे. परंतु त्याचा वापर अद्याप करण्यात आलेला नाही. इमारतीचे फायर ऑडिट गेल्या कित्येक वर्षापासून करण्यात आलेले नाही. त्यामुळे ते बंब मुदतबाह्य झाले आहेत. प्रसंगी आगीची घटना घडल्यास प्रसंग कसा हाताळण्यात यावा, याकरिता प्रात्याक्षिक देखील आजतागायत करण्यात आलेले नाही. गंगाबाई




रुग्णालयात असलेल्या अतिदक्षता कक्षात एक्झिटद्वार देण्यात आले नाही. त्यामुळे प्रसंगी आग लागल्यास बाहेर पडणार कसे, हा देखील प्रश्न आहेच. अतिदक्षता विभागात पाण्याची कसल्याही प्रकारची ोसय नसल्यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या प्रसंगाला तोंड देताना कमालीचा त्रास सहन करावा लगणार आहे. आरोग्य विभागातील प्रशासकीय यंत्रणा कमिशनपोटी केवळ मोठ्या साहित्याच्या खरेदीकडे लक्ष देत, परंतु लहानसहान आणि महत्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे एकंदरीत परिस्थितीवरुन समजून येते. बाई गंगाबाई रुग्णालय अणि बालकाकरिता असलेल्या अतिदक्षता विभागात ठिकठिकाणी केबल निघाले आहेत. बोर्ड तुटले आहेत. त्यामुळे शॉर्ट सर्किटला वाव आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने तेथे असलेल्या बालकांच्या जीवाशी खेळण्याचाच प्रकार सुरु असल्याचे म्हटल्यास अतिश्योक्ती होणार नाही.

### बालरोगतज्ज्ञ सांभाळतात मेडिसीन विभाग

**शासनाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध विभागातील कर्मचाऱ्यांची पदे भरली आहेत. त्या–त्या विषयात प्राविण्य असलेल्या डॉक्टरांना त्यांच्या पदवीप्रमाणे काम देणे गरजेचे आहे. परंतु बालरोगतज्ज्ञ असलेल्यांना मेडिसीन विभाग सांभाळण्याची जवाबदारी देण्यात आली आहे. परिणामी बालकांना उपचारापासून वंचित राहावे लागते.**

# सौंदड येथे श्रमदानातून बांधला बंधारा

सडक अर्जुनी : तालुक्यातील सौंदड येथे उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जवळील चुलबंद नदी पात्रात जनशक्ती युवा पॅनलच्या पुढाकाराने श्रमदानातून ग्रामवासियांनी १०० मीटर लांबीचा बंधारा बांधला. या उपक्रमामुळे सौंदड ग्राम पाणी टंचाईपासून मुक्त राहणार आहे.



रविवार, १७ जानेवारीला एक दिवसीय श्रमदानात सौंदड येथील शेकडो महिला, पुरुष व युवकांनी एकत्रीत येऊन बंधारा निर्मिती केली. सौंदड गावाची लोकसंख्या दहा हजाराच्या वर असून नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा याच चुलबंद नदीच्या पात्रातून ग्रामपंचायतद्वारे करण्यात येतो. गावात ७०० च्या जवळपास खाजगी नळधारक असून ३ हजार ५०० ते ४ हजार नागरिकांना दररोज २ लाख ४० हजार लिटर पाणी मिळते. परंतु नदीपात्रात कायमस्वरुपी बंधारा नसल्याने उन्हाळ्यात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. ही समस्या निर्माण होऊ नये या उद्देशाने जनशक्ती युवा पॅनल, युवा नेटवर्क मैत्री मंच व युवार% संघटनच्या महिलांनी व युवकांनी एक हजार पिशव्यांमध्ये वाळू भरून बंधारा निर्मिती केले आहे.

सरपंच तथा जनशक्ती युवा पॅनलच्या संस्थापक गायत्री इरले यांच्या नेतृत्वात हा उपक्रम घेण्यात आला. यात जनशक्ती युवा पॅनलचे सचिव रोशन शिवनकर, नंदकिशोर डोंगरवार, लालचंद खडके, रंजना भोई, मिनाक्षी विठ्ठले, दुर्गा ईरले, माधवी शैलेश विठ्ठले, अशोक विठ्ठले, माधुरी यावलकर, गीता मेर्शाम, दिक्षा बडोले, संगीता राऊत, स्वाती कोरे, विनोद नंदरधने, दिलीप डोंगरावर, युनेश भेंडारकर, विजय नगरकर, आशिष राऊत, शैलेश राऊत, सुषमा डोये, रूपेश राऊत, ज्योती बर्वे, किरन भुमके, अंजु इरले, लता हटकर, पेमु इरले, राजेश भुसारी, नमिता भेंडारकर, रंजीत चुटे, सुभाष टेंभुर्णे, टिकाराम पातोडे यांच्यासह गावातील शेकडो महिला, पुरुष व युवकांनी सहभाग घेतला.

यावेळी बंधारा निर्मितीच्या कार्यात सहभागी नागरिकांसाठी जनशक्ती युवा पॅनलकडून भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

# सौभाग्यवतींसाठी श्री ची धडपड

**भंडारा:** १७,४७० मतदारसंख्या असलेल्या ठाणा जिल्हा परिषद क्षेत्रात सहा गावांचा समावेश असला तरी ही गवे अन्य क्षेत्राच्या तुलनेत लोकसंख्येने मोठी आहेत. सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव झालेले हे क्षेत्र मागीलवेळी सर्वसाधारण क्षेत्रासाठी होते. आरक्षणामुळे हे क्षेत्र आता महिलाशक्ती गाजवणार आहेत. या क्षेत्रातून आपल्याच सौभाग्यवतीला उमेदवारी मिळावी, यासाठी श्रीमानांनी पक्षाकडे मोर्चेबांधणी सुरु केली आहे. पुढच्या महिन्यात जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असून या निवडणुकीसाठी सौपेक्षा श्री मध्येच अधिक उत्साह संचारला आहे.

सन २००५ मध्ये या क्षेत्रातून काँग्रेसचे राजकपुर राऊत त्यानंतर २०१० मध्ये भाजपच्या नीता आकरे आणि २०१५ मध्ये भाजपचे चंद्रप्रकाश दुरुगकर निवडून आले. मागील १० वर्षापासून हे क्षेत्र भाजपकडे आहे. त्यामुळे परंपरागत क्षेत्र आपल्याकडे खेचून आणण्यासाठी ही निवडणूक अस्तित्वाची तर गड कायम ठेवण्यासाठी भाजपसाठी प्रतिष्ठेची राहणार आहे.

ठाणा जिल्हा परिषद क्षेत्रात ठाणा, परसोडी, शहापूर, चिखली, खरबी आणि नांदोरा या सहा गावांचा समावेश आहे. काँग्रेसकडून ममता सुभाष वाडीभस्मे, माधुरी चंद्रकांत कारेमोरे यांनी दावेदारी केली असून ठाणाचे सरपंच शिवदास उरकुडे हे सुनेच्या उमेदवारीसाठी प्रयत्नशील आहेत. भाजपकडून विद्यमान सदस्य चंद्रप्रकाश दुरुगकर यांच्या उमेदवारीसाठी प्रयत्नशील असून डॉ. पोर्णिमा फटिंग यांनीही उमेदवारीसाठी दावेदारी केली आहे. राष्ट्रवादीकडून शहारपुरचे अनिल कळंबे, राजेश डोरले तर शिवसेनेकडून संजय आकरे, शरद धांडे हे पत्नीच्या उमेदवारीसाठी पक्षाकडगे मोर्चेबांधणी करीत आहेत. याशिवाय वंचित आघाडी, बसपा आणि रिपाईकडून कोण कुणाला उमेदवारी देणार याकडे राजकीय पक्षांचे पक्ष लागले आहे.

या निवडणुकीत महाविकास अघाडी संयुक्त लढणार असेल तर ही जागा वाटपात ही जागा कुणाच्या वाट्याला जाते हे पाहणे मजेशीर ठरणार आहे. काँग्रेसकडून ममता वाडीभस्मे तर भाजपकडून रेखा दुरुगकर हे तरी सध्या प्रबळ दावेदार मानले जात आहे. परंतु राजकारणात ऐनवेळी समीकरणे ठरत असतात.

### वडसा रेल्वे सल्लागार समितीत दहा जणांची नियुक्ती

**देसाईगंज:** अतिदुर्गम आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील एकमेव रेल्वे स्टेशन असलेल्या वडसा रेल्वे स्टेशन च्या वडसा रेल्वे सल्लागार समितीत शहरातील दहा जणांची नियुक्ती केल्याबाबत दक्षिण पुर्व मध्य रेल्वे नागपुर च्या विभागीय कार्यालयाचे पत्र क्रमांक ऋ२७/डब्उ चएएढखछत्र/२०–२१ अन्वये दि ७ जानेवारी २०२१ ला वरिष्ठ विभागीय वाणीज्यीक व्यवस्थापक यांनी नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहे.

नव नियुक्त वडसा रेल्वे सल्लागार समिती मध्ये राजेश जेठानी, डॉ विष्णु वैरागडे, दिपक विधाते, नरेश विठलानी, शालुताई दंडवते, संतोष शामदासानी, कोडंधारी नाकाडे,सचिन खरकाटे,प्रितपालसिंग टुटेजा आणि श्री शेबे या दहा जणांचा समावेश असुन सदर नियुक्ती दोन वर्षासाठी केल्याचे नियुक्ती आदेशात नमुद केले आहे.नव नियुक्त वडसा रेल्वे सल्लागार समिती कार्यकारनीचे श्रेय गडचिरोली चिमुर लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे खासदार अशोक नेते यांना देण्यात आले आहे.

#### समितीची असते अहम भुमिका

वडसा रेल्वे स्टेशन चा सर्वांगीन विकास साधण्यासाठी रेल्वे सल्लागार समितीची भुमिका अहम मानल्या जात आहे. वडसा रेल्वे सल्लागार समिती ने मागील सहा वर्षापासून दक्षिण पुर्व मध्य रेल्वे च्या वरिष्ठ अधिकाय्रांकडे सातत्याने मागणी व पाठपुरावा केल्यानेच वडसा रेल्वे स्टेशनवर अनेक विकासात्मक योजना राबविण्यात आले आहेत हे विशेष.

### जिल्हा वार्षिक योजनेत निधी वापरावरील बंधने शिथिल, जि.प.ला मिळणार पैसे



**गोंदिया:** जिल्हा वार्षिक योजनेतून दरवर्षी जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा तयार करुन त्यासाठी तरतूद केली जाते. मागील वर्षी १६७ कोटी ४५ लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. यापैकी १६७ कोटी २१ रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला. मात्र मागील वर्षी कोरोनामुळे विविध विकास कामेक रता आली नाही. तर शासनाने सुद्धा निधी खर्च करण्यावर बंधने घातली होती. मात्र आता ही बंधने शिथिल करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेला विविध विभागाना निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यात कृषी करिता १४ कोटी ७० लाख, ग्रामीण विकासासाठी १२ कोटी ७० लाख, सामाजिक विभागासाठी ६ कोटी १८ लाख, सामान्य प्रशासन ८ कोटी, परिवहन १ कोटी ७५ लाख, पाटबंधारे विभाग १२ कोटी २० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

**बातम्यासाठी बेरार टाईम्स पोर्टलला नक्की भेट द्या, आम्ही डेलीहंटवर सुध्दा आपल्यासाठी उपलब्ध**

# आरोग्य भारतीची शाखा गठित

**तिरोडा:** येथील खैरलांजी रोडवरील स्थानिक दया हॉस्पिटलमध्ये घेण्यात आलेल्या बैठकीत आरोग्य भारती शाखा गठीत करण्यात आली. निसर्गोपचार, योग, प्राणायाम, घरगुती औषधी, मानसीक तणाव व्यवस्थापनाच्या माध्यमातून जनतेचे मानसीक व शारीरिक आरोग्य सांभाळण्यासाठी तज्ञांकडून मार्गदर्शन करणे, स्वयंसेवी आरोग्य सेवकांचे जाळे निर्माण करणे व त्यांना प्रशिक्षित करणे, तसेच आरोग्य शिबीर व मेळाव्याचे आयोजन करुन जनआरोग्य सुव्यवस्थित राखण्यासाठी प्रयत्न करणे, आरोग्य व्यवस्थापणासाठी छोटेखानी गाव किंवा शाळा दत्तक घेणे, हे आरोग्य भारतीचे उद्देश आहे.




आरोग्य भारती तिरोडा शाखेचे अध्यक्ष म्हणून डॉ.संदीप विठ्ठल मेर्शाम, उपाध्यक्ष डॉ.संजय रहांगडाले, सचिव राजेश मलघाटे, सहसचिव संदीप खणंग, कोषाध्यक्ष रविंद्र वंजारी तर सदस्यांमध्ये डॉ.कुमुद संदीप मर्शाम, डॉ.श्रद्धा संजय रहांगडाले, दिगंबर ढोक, उमाशंकर पारधी, नितीन रोहिले, दूष्यंत रेभे, कपिल भोंडेकर व डॉ.मुकेश रामचंद्र यांचा समावेश आहे. ही नियुक्ती व्यवस्था ३ वर्षांकरिता राहणार आहे. याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून आरोग्य भारतीचे अ.भा.संघटनमंत्री डॉ.अशोक वार्षनेय, पश्चिम प्रांत संयोजक मिलिंद ढगे, विदर्भ प्रांत उपाध्यक्ष डॉ.शाम कटरे, गोंदिया जिल्हा अध्यक्ष शाम चंदनकर, सचिव पुष्कर बारापात्रे, मुकेश येरपुडे, अनूप कटारे, बी.बी. रहांगडाले, विठ्ठल मेर्शाम, रोहीत रहांगडाले आदी उपस्थित होते.

# विचार स्वातंत्र्य-अर्थात माहितीचा अधिकार

भारतीय राज्य घटनेचे कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार भारतीय नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंर्त्याचा मूलभूत हक्क बहाल केलेला आहे. अभिव्यक्ती स्वातंर्त्यामध्ये आपले मत व्यक्त करणे, एखादी बाब जाणुन घेणे, एखादी माहिती प्राप्त करणे याचा देखील अंतर्भाव आहे. त्याचा जीवन जगण्याच्या मूलभूत अधिकाराशी थेट संबंध आहे. लोकशाही राज्यात नागरिकांच्या कल्याणासाठी शासन प्रशासन विविध योजना बनवून राबवित असते. या योजना राबवितांना पारदर्शकता व उत्तरदायित्व राखले जावे अशी सामान्य नागरिकांची अपेक्षा असते. अशा अपेक्षांना जेव्हा तडा गेला तेव्हा भारतीय संसदेला केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा पारित करण्याची गरज भासली. तथापि, प्रत्यक्ष हा क्रांतिकारी कायदा राबवितांना माहिती प्रदानात त्रुटी दिसून आल्या. तेव्हा राज्य विधी मंडळाला नियम तयार करण्याची तर प्रशासनाच्या स्तरावरून शासन परिपत्रके निर्गमीत करण्याची गरज भासली. तरीदेखील कायद्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्रुटी राहू लागल्या. राज्य महिती आयोगाच्या स्तरावरून यावर मात करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

जेव्हा फेब्रुवारी, २०२० च्या शेवटी कोरोना विषाणूचा उद्रेक झाला व सर्व जगाचे व्यवहार ठप्प झाले होते, त्याला माहिती आयोग देखील अपवाद राहिले नव्हते. तेव्हा दूरस्थ पद्धतीने काम करण्याची कार्यपद्धती विकसित करण्याचे प्रयत्न करण्यात आले. सुरवातीला ई–मेल द्वारे नोटीस पाठवून गुगल मिट या अॅ?लीकेशन वरून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सूनावण्या आयोजित करण्यात आल्या. सामान्य नागरिकांचे ई–मेल आयडीच काय तर साधे संपर्कासाठी मोबाईल क्रमांक देखील आयोगाकडे उपलब्ध नव्हते. या समस्येवर मात करण्यासाठी प्रत्यक्ष नोटीस देऊन सुनावणीसाठी बोलाविण्याबाबत संबंधित प्राधिकरणांना सांगण्यात आले.

यापुढील टप्पा गाठण्यासाठी यापूर्वीच विकसित करण्यासाठी हाती घेतलेले सॉफ्टवेअरचे काम पूर्णत्वास नेण्याचा चंग बांधला गेला व ते ऑक्टोबर, २०२० चे अखेरीस पुर्णत्वास नेले. यामधे अमरावती खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातील पाचही जिल्ह्यातील सर्व कार्यालयातील सर्व जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा डेटा बेस बांधण्यात आला. यावरून प्रत्यक्ष अँप्लिकेशनवर सादर केलेल्या तपशिलाच्या आधारावर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना स्वयंचलीतपणे नोटीस जाऊन घरच्या घरून मोबाईलवरून सुनावणीला हजेरी लावण्याची सोय करण्यात आली. आदेश सुद्धा घरपोच मोबाइलवर उपलब्ध करून देण्यात आले. कोरोनाच्या काळात घरच्या घरी ही व्यवस्था झाली. नागरिकांना घरच्या घरी आपल्या मोबाईलवर सुनावणीचे प्रकरणे पाहता येतील, आयोगाकडे माहितीबाबत ऑनलाइन तक्रार दाखल करता येईल, आयोगाने पारित केलेले आदेश पाहता




येतील, मुद्रित प्रत घेता येइल व माहितीच्या कायद्याविषयी जाणून घेता येईल अशी वैशिष्ट्यपूर्ण अंगे या सॉफ्टवेअरला जोडल्या गेली. त्यामुळे हे सॉफ्टवेअर सुलभपणे हाताळण्यायोग्य झाले आहे. त्याचा सर्व नागरिकांनी लाभ घेता येईल. आयोगाच्या वेब साईटचे URL, http://www.rti.rtipranali.com:8084/RTI_Web/ अशी आहे. यावरील सुविधा नागरिकांना केवळ क्लिक करून पाहता येतील. त्यासाठी कोणत्याही लॉगीन, पासवर्डची आवश्यकता नाही.

यापुढील टप्पा म्हणजे लवकरच आम्ही आयोगाच्या अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या पाचही जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरण स्तरावरील माहितीची प्रकरणे त्या कार्यालयात माहितीप्रदानासाठी नियुक्त असलेले जनमाहिती अधिकाऱ्यांसाठी वेब ॲप्लिकेशन बनवीत आहोत. माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करतांना जनमाहिती अधिकारी यांना वेळेवर व बिनचूक काम करण्यासाठी प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. राज्य जन माहिती अधिकारी हा माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा दुवा आहे. त्यांनी चूक केल्यास पुढे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या देखील चुका होतात. आयोगाच्या स्तरावरील द्वितीय अपील अर्जाची संख्या वाढीस लागते. मग जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे विरुद्ध शास्ती व विभागीय चौकशी आदेशित होऊन शिक्षा होते. माहितीप्रदानात व माहितीचे अर्ज निकाली काढण्यात जनमाहिती अधिकाऱ्याची भूमिका असते. आजघडीला जन माहिती अधिकारी हा कायद्याविषयी अज्ञानी, अत्यंत दुबळा कार्यालय प्रमुख व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडून दुर्लक्षित असल्यामुळे त्याला शिक्षा होते.

दर वर्षी राज्य जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना १.०७ कोटीचे दंड तर १५० च्या आसपास अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी आदेशित झाली आहे, हे चित्र बदलले पाहिजे. यासाठी राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती यांनी एक महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. तो प्रकल्प म्हणजे आयोगाच्या स्तरावरील द्वितीय अपील सुनावणीसाठी तयार केलेल्या वेब ॲप्लिकेशन सारखे ?प्लिकेशन जनमाहिती अधिका?यांसाठी तयार करण्याचा. या महिन्यात हे सॉफ्टवेअर विकसित होईल व त्यांच्या उपयोग करता येईल. राज्य जन माहिती अधिकारी हा माहितीचा अर्ज वेळेत व नियमानुसार निकाली काढण्यासाठी नेविगेट करेल. त्याचे अभिलेख राहील. ते अभिलेख आयोगास स्वयंचलितपणे प्राप्त होईल. कोणालाही कोणतीही शिक्षा होणार नाही.

जन माहिती अधिकाऱ्यास अनेक परिस्थितीत अनेक अशा आवश्यक नोटीस द्यावे लागतात. त्याच्या टेम्पलेट तयार असतील. त्या कमांड दिल्याबरोबर ऑन स्क्रीन पॉपअप होतील. त्याच्या ऑटोमेशनने संबंधितांना ईमेल जातील. त्यांच्या ऑनलाइन पोहच तयार होतील. वेगळ्या पुराव्याची गरज भासणार नाही. विशेष म्हणजे जनमाहिती अधिकाऱ्यास अनेक प्रसंगी Statutery आदेश तयार करावे लागतात. मात्र हे त्यांना माहीत नाही. अनेक आदेशांच्या देखील टेम्पलेट असतील व माहिती अधिकार अधिनियमाच्या संबंधित कलमानुसार ते आदेश ऑटोमेशनने वापरता येतील. विशेष म्हणजे यासाठी प्रत्येकाकडे असलेल्या अँड्रॉइड मोबाईल पुरेसा असेल. लॅपटॉप असलाच पाहिजे, असे आवश्यक नाही. ते युजर फ्रेंडली असून ते याच जानेवारी महिन्यात उपलब्ध होईल.

**संभाजी मोतीराम सरकुंडे**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती–नागपूर खंडपीठ**

# ग्राम पंचायत निवडणुकीत महाविकास आघाडीची सरसी





**गोंदिया** जिल्ह्यातील मुदत संपलेल्या १८९ ग्रामपंचायतीमध्ये १६३१ जागांसाठी शुक्रवार १५ जानेवारी रोजी मतदान झाले होते. त्याचा निकाल १८ जानेवारी रोजी जाहीर झाला. ही निवडणूक कुठल्याही राजकीय पक्षाच्या चिन्हावर लढवली जात नसली तरी पक्ष सर्मथनाने लढविल्या जात असल्याने सर्वच राजकीय पक्षाकडून निकालानंतर सत्त-ेचा दावा होत आहेत. भाजपा ६८,राष्ट्वादी कॉग्रेस ५६,भारतीय कॉग्रेस २९,महाविकास आघाडी ११,अपक्ष जागा १०,गोंदिया अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांचा चाबी १४ जागा जिल्ह्यात भाजप सर्मथित उमेदवारांनी बाजी मारल्याचे दिसत असून जवळपास ५० टक्के ग्रामपंचायतींवर झेंडा रोवल्याचे दावा केला जात आहे. मात्र, अन्य पक्षही विजयाची आ-पली दावेदारी करीत असल्याने पुढील सरपंच व उपसरपंच पदाच्या आरक्षणाची प्रतिक्षा शिगेला लागली आहे.

जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतीसाठी शुक्रवार, १५ जानेवारी रोजी मतदान घेण्यात आले. एकूण १६९३ जागांसाठी ही निवडणूक होती. मात्र ३११ जागा बिनविरोध आल्याने १३८२ जागांसाठी प्रत्यक्षात ३१५१ उम ेदवार निवडणूक रिंगणात होते.

गोरेगाव तालुका २५ जागा पैकी भाजप १२,राष्ट्रवादी कॉंग्रेस ८,भारतीय कॉँग्रेस ५, सालेकसा तालुका ९ पैकी भाजपा ५ जागा तर महाविकास आघाडीला ४ जागा, आमगाव तालुका २२ जागा पैकी भारतीय कॉँग्रेस ६, राष्ट्रवादी कॉग्रेस ९,भाजपा ७ जागा, तिरोडा तालुका १९ पैकी भारतीय कॉँग्रेस ४, राष्ट्रवादी कॉग्रेस७, भाजपा ६ जागा ,अपक्ष ४ जागा, सडक अर्जुनी तालुका १९ पैकी भाजप ७,राष्ट्रवादी कॉँग्रेस ६,भारतीय कॉग्रेस १ जागा,महाविकास आघाडी ५ जागा, अर्जुनी मोरगाव तालुका २९ पैकी भाजपा ८,राष्ट्रवादी कॉग्रेस १३ , कॉँग्रेस ४ , अपक्ष ३ जागा १ जागी बहिष्कार, देवरी तालुका तालुका २९ पैकी भाजप १०,राष्ट्रवादी कॉंग्रेस ९, भारतीय कॉँग्रेस ८,महाविकास आघाडी २ जागा, गोंदिया तालुका ३७ पैकी भाजप,१४ राष्ट्रवादी कॉंग्रेस ५ ,भारतीय कॉँग्रेस १,अपक्ष ३, आणि अपक्ष आमदार विन-ोद अग्रवाल यांचा स्वतंत्र चाबी पॅनलला १४ जागा मिळाल्या.

गोंदिया तालुक्यातील रावणवाडी येथे भाजप सङ्घर्थित परिवर्तन पॅनेलचे आठ, तर चावी संघटनेचे ३ उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे या ग्राङ्कपंचायतीवर भाजप समर्थित पॅनेलचा झेंडा रोवला जाणार आहे. काटी, गर्रा येथेही भाजप समर्थित पॅनेलचा विजय झाला आहे. ङ्गोगर्रा ग्राङ्कपंचायतीत चावी संघटनेचे ५ व अन्य चार उमेदवार निवडून आले आहेत. सडक अर्जुनी तालुक्यातील रेंगेपार पांढरी ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी कॉंग्रेस समर्थित ग्रामविकास पॅनेलचे सर्वच म्हणजे ९ उमेदवार निवडून आले आहेत. पांढरी ग्रामपंचायतीत भाजप समर्थित पॅनेलचे आठ, तर राष्ट्रवादी कॉंग्रेस समर्थित पॅनेलचे ३ उमेदवार विजयी झाले आहेत.

घटेगाव ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी समर्थित पॅनेलचे ६, तर भाजप समर्थित पॅनेलचे ३ उमेदवार निवडून आले आहेत. सडक अर्जुनी तालुक्यात भाजप समर्थित पॅनेलचे ७, कॉंग्रेस समर्थित पॅनेलचा १, राष्ट्रवादी कॉंग्रेस समर्थित ६, तर महाविकास आघाडी समर्थित ५ उमेदवार निवडून आले.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कन्हाळगाव, मांडोखाल व देवल-



गाव या तीन ग्रामपंचायती यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या. अकरा लहान-मोठी गावे मिळून बनलेल्या भरनोली गटग्रामपंचायतीत निवडणुकीवर मतदारांनी बहिष्कार टाकल्याने निवडणूक होऊ शकली नाही. त्यामुळे २५ ग्रामपंचायतींची निवडणूक झाली. विशेष म्हणजे बाराभाटी ग्रामपंचायतीमध्ये सर-स्वता केवळराम चाकाटे व उषा रवी नाईक यांना २३४ अशी समान मते पडल्याने शेवटी लिंहासू शहारे (वय ४) या बालकाच्या हातून ईश्वरचिठ्ठी काढण्यात आली. यात सरस्वता केवळराम चाकाटे या ईश्वरचिठ्ठीने विजयी झाल्या.

केशोरी ग्रामपंचायतीत भाजपप्रणीत पॅनेलचा विजय झाला. येथील ग्रामपंचायतीची निवडणूक भाजपप्रणीत पॅनेल व महाविकास आघाडी यांचे पॅनेल अशा दोन पॅनेलमध्ये लढण्यात आली. या निवडणुकीत भाजपप्रणीत पॅनेलचे आठ उमेदवार विजयी झाले. महाविकास आघाडी समर्थित पॅनेलचे पाच उमेदवार निवडून आले.

आमगाव तालुक्यात २२ ग्रामपंचायतींच्या १८२ सदस्यांकरिता निवडणूक घेण्यात आली. मतमोजणीत भाजप समर्थित पॅनेलचे ६८ उमेदवार, कॉंग्रेस समर्थित पॅनेलचे ६४, राष्ट्रवादी कॉंग्रेस समर्थित पॅनेलचे ३७ व अन्य १३ उमेदवार निवडून आले.

## गोरेगाव तालुक्यात महाविकास आघाडीने मारली बाजी

**गोरेगाव :** तालुक्यातील २५ ग्रामपंचायतींचा निकाल जाहीर झाला. यात राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस समर्थित पॅनेलने जोरदार मुसंडी मारत १४ व स्वबळावर कॉंग्रेस समर्थित पॅनेलने चिचगाव ग्रामपंचायतीवर वर्चस्व प्रस्थापित केले. महाविकास आघाडी समर्थित पॅनेलला १४ व भाजप समर्थित पॅनेलला १० ग्रामपंचायतींवर समाधान मानावे लागले आहे.

या ग्रामपंचायत निवडणुकीत दिग्गजांना पराभवाला सामोरे जावे लागले. चिचगाव येथील माजी सरपंच तथा कॉंग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे यांनी ९ जागा जिंकत चिचगाव येथे कॉंग्रेसला सत्तेवर आणले आहे. कटरे स्वतः ग्रामपंचायत निवडणुकीत उभे होते. यातच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक त्र्शीपाल टेंभरे यांना पराभवाचा साङ्कना करावा लागला. पाथरी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस समर्थित पॅनेलने गड राखला आहे.

## माजी पंचायत समिती सदस्यांचा गढ ढासळला

**तिरोडा :** तालुक्यातील पालडोंगरी हे माजी पंचायत समिती सदस्य प्रवीणकुमार पटले यांचे गाव. त्यांच्या पॅनेलमधील नऊ उमेदवारांपैकी वर्षा टेंभरे या एकमेव उमेदवार निवडून आल्या आहेत. त्यामुळे पंधरा वर्षांपासून कायम असलेला पटले यांचा गढ या निवडणुकीत ढासळला आहे. आठ उमेदवारांपैकी सात उमेदवार हे चंद्रकुमार चौधरी यांच्या पॅनेलङ्कधून जिंकून आले आहेत. स्वतंत्र उमेदवारांपैकी दिलीपकुमार मिताराम रहांगडाले विजयी झाले आहेत.

तिरोडा तालुक्यात बाळापूर ग्रामपंचायतीत बिनविरोध निवडणूक झाली. त्यामुळे १८ ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली होती. यात राष्ट्रवादी कॉंग्रेस समर्थित पॅनेल आघाडीवर असल्याचे बोलले जाते.

## ग्रामपंचायतींवर कॉंग्रेस समर्थित पॅनेलचे वर्चस्व

**देवरी :** तालुक्यातील २९ ग्रामपंचायतींपैकी २८ ग्रामपंचायतींच्या मतमोजणीत २५ ग्रामपंचायतींवर कॉंग्रेस समर्थित पॅनेलने विजय मिळविल्याचे बोल-ले जात आहे. विजयावर दावे-प्रतिदावे होत आहेत. एकंदरीत तालुक्यात कॉंग्रेस समर्थित पॅनेलचे वर्चस्व असल्याची माहिती समोर आली आहे.

## मनसेने उघडले खाते

ग्रामपंचायत निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने खाते उघडले आहे. गोंदिया तालुक्यातील फुलचूर ग्रामपंचायतीत वॉर्ड क्रमांक दोनमधून मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष मिलन रामटेककर हे विजयी झाले. देवरी तालुक्यातील भर्रेगाव येथे वॉर्ड क्रमांक २ मधून जयेंद्र काशिराम मेंढे व संगीता मुकेश दर्रो विजयी झाले. हे सर्व उमेदवार नवनिर्माण पॅनेलवर निवडणूक लढले होते. आम आदमी पक्षाचे उमेदवार ही निवडून आले आहेत.



गोंदिया : मनसेच्या विजयी उमेदवारांचे अभिनंदन करताना पदाधिकारी.



सडक अर्जुनी : येथे विजयोत्सव साजरा करताना विजयी उमेदवार.



अर्जुनी मोरगाव : गुलाल उधळून आनंद व्यक्त करताना विजयी उमेदवार व कार्यकर्ते.



सडक अर्जुनी : येथे विजयोत्सव साजरा करताना विजयी उमेदवार.

## २६ जानेवारी रोजी संविधान मित्र पुरस्कार सोहळा

**गोंदिया:** - संविधान मैत्री संघ व मित्र संघटनांच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी ला ङ्गसंविधान का सम्मानङ्क जागर कार्यक्रमा अंतर्गत समाजात आपल्या उल्लेखनीय कार्यातुन, विविध क्षेत्रात विशिष्ट नि: स्वार्थ सेवा देणा-यांचे विविध कैटेगरीतील संविधान मित्र पुरस्कार दिला जात आहे.

संविधान मैत्री संघाच्या वतीने या वषीपासून विविध क्षेत्रात देण्यात येणा-या संविधान मित्र पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र व्यक्तींकडून विहित नमुन्यात नामांकन प्रस्ताव मागविण्यात आले आहे. संविधान मित्र पुरस्कारासाठी निश्चित केलेल्या पात्रता आणि निकषांनुसार स्पष्ट शिफारसीसह पात्र व्यक्तींचे नाम ांकन प्रस्ताव, २३ जानेवारीपर्यत संविधान मित्रमंडळाने नि:शुल्क मागविले आहे.

संविधान मित्र हा जिल्ह्यातील सार्वजनिक रित्या प्रदान करण्यात येणारा पहिला सन्मान पुरस्कार आहे. या पुरस्कारामध्ये उत्कृष्ट सेवा कार्याला प्राथमिक मान्यता दिली जाणार आहे.

कला, साहित्य, शिक्षण, क्रीडा, आरोग्य चिकित्सा, समाज प्रबोधन, सामाजिक कार्य, रोजगार, सार्वजनिक व न्यायालयीन कामकाज, ना-गरी सेवा, पत्रकारिता इत्यादी सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित व विलक्षण कामगिरी / सेवेसाठी हे पुरस्कार प्रदान केले जाईल. कोणतीही व्यक्ती कोणत्याही जाती, व्यवसाय, धर्म किंवा लिंगभेदाशिवाय या पुरस्कारांना पात्र आहेत.

गोंदिया जिल्ह्यात नि: स्वार्थ सेवा देणा-या, विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणा-या संस्थेच्या नामांकनासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अर्ज स्वीकारण्याचा पत्ता, संविधान मैत्री संघ जनसंपर्क कार्यालय अशोक म ेश्राम टी पॉईंट गर्ल्स कॉलेज रोड, गोंदिया, अधिक माहिती करिता संयोजक अतुल सतदेवे यांच्याशी संपर्क साधता येईल.

## १४ लाख लोकांची अन्नसुरक्षा वाऱ्यावर रिक्त पदांचा अडसर

**गोंदिया:** जिल्ह्यात आठ तालुके असून सर्व तालुक्यात १४ लाखांवर लोक वास्तव्यास आहेत. परंतु या लोकांची अन्न व औषध सुरक्षा वाऱ्यावर आहे. जिल्ह्यातील मेडीकल किंवा हॉटेलचीही तपासणी होत नाही. त्यामुळे हॉटेलचालक किंवा मेडीकलचालकांचा कारभार यावर या विभागाचे फारसे नियंत्रण नाही. गोंदिया जिल्ह्याची परिस्थिती पाहता जिल्ह्यात ४५० हॉटेल्स आहेत. या हॉटेलातून विक्री होणाऱ्या पदार्थावर बेस्ट बी फोर असणे आवश्यक आहे. असे केंद्र शासनाचे निर्देश असतानाही गोंदिया जिल्ह्यातील अनेक दुकानांतील पदार्थावर बेस्ट बी फोर लिहिलेच जात नाही. या हॉटेलांची तपासणीच होत नसल्यामुळगे हॉटेल मालक बिनधास्त वागत आहेत. मुदतबाहय पदार्थ अनेक हॉटेलांमधून दिसून येतात. या हॉटेलांचीच तपासणी करणाऱ्यासाठी गोंदिया जिल्ह्याला दोन अन्न निरीक्षक आहेत. परंतु त्यांनी केलेल्या जुन्या कारवायांच्या प्रक्रियेतच ते अडकून राहतात. हॉटेलांची कधी-कधी तपासणी होते. परंतु मेडीकल तपासणी मागील दोन वर्षांपासून झालीच नाही. याकडे सध्या कुणाचे लक्ष नाही.

### औषध निरीक्षकच नाही

गोंदिया जिल्ह्यात ६०० पेक्षा अधिक मेडीकल स्टोअर्स आहेत. परंतु जिल्ह्यातील या मेडीकल स्टोअर्सवर नजर ठेवण्यासाठी शासनाने एक औषध निरीक्षकाचे पद मंजूर केले आहे. परंतु सद्यस्थितीत जिल्ह्यात औषध निरीक्षकच नसल्यने मेडीकलची नियमित तपासणी होत नसल्याची बाब पुढे आली आहे.



### हॉटेलातील बेस्ट बी फोर गायब

हॉटेल, बेकरी अशा अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या प्रतिष्ठावंत बेस्ट बी फोर लिहिणे आवश्यक असल्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले होते. या निर्देशानंतर फक्त १० ते १५ दिवस काही हॉटेलचालकांनी त्या पदार्थासमोर बेस्ट बी फोर लिहिले. परंतु त्या प्रतिष्ठाणांची तपासणीच होत नसल्यामुळे हॉटेलचालकांनी बेस्ट बी फोर लिहिणेच बंद केले आहे.

हॉटेलची आम्ही तपासणी करतो. तपासणीत चुका आढळल्या तर त्यांना नोटीस देऊन कारण विचारले जाते. अनागोंदी कारभार असला किंवा भेसळ असली तर साहित्य जप्त करुन कारवाई केली जाते. संशय आलेले पदार्थ सील करुन प्रायोगशाळेत पाठविले जातात.

## वडेट्टीवारांच्या नेतृत्वात ग्रा.पं.निवडणुकीत काँग्रेसला यश

**चंद्रपुर/गडचिरोली:** गेल्या काही दिवसांपासून ग्रामपंचायत निवडणुकीची रनधुमाळी सुरु होती. चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यातील दमदार व कनखर नेतृत्व असलेले राज्याचे मदत व पुनर्वसन, बहुजन कल्याण, आपत्ति व्यवस्थापन मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडिने ग्रामपंचायत निवडणुका लढविल्या होत्या. आज निवडणुकीचा निकाल हाती येताच दोन्ही जिल्ह्यात कॉंग्रेस व महाविकास आघाडीचे ७० ते ८० टक्के उमेद-वार विजयी झाले आहे.

दोन्ही जिल्ह्याचे नेते विजय वडेट्टीवार यांनी स्थानिक पातळीवर होणा?या निवडणुकीत रणनीति आखुन निवडणुकीत रनसिंग फुंकले, महाविकास आघाडीचे कार्यकर्ते जोमाने प्रचारात उतरले. ग्रामपंचायत निवडणुकीचा निकाल जाहीर होताच सर्वच महाविकास आघाडिचे उमेदवार विजयी झाले असून अनेक ग्रामपंचायतीवर एकहाती सत्ता प्राप्त केली आहे.

या प्रसंगी राज्याचे मंत्री विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, राज्यात महाविकास आघडीची सत्ता येवून एक वर्ष पूर्ण झाली. महाविकास आघाडिने गेल्या वर्षभरात जनतेच्या हिताचे निर्णय घेवून काम केले आहे, करीत आहे. त्यामुळे राज्यातील जनतेनी कांग्रेसला महाविकास आघाडिच्या उमेदवाराना प्रचंड मतानी विजयी केले आहे. आज राज्यात कॉंग्रेस पक्ष एक नंबर वर विजयी झालेला असून चंद्रपुर व गडचिरोली जिल्हातील ७५ ते ८० टक्के ग्रामपंचायतीवर कांग्रेस महाविकास आघाडिचा झेंडा फड़कलेला आहे असे प्रतिपादन त्यांनी केले

### नागपूर हायकोर्टाचा वकील झाला ग्रामपंचायत मेंबर



**चंद्रपुर:** दिल्लीतील आंतरराष्ट्रीय जवाहर नेहरू विद्यापीठातून पीएचडी पदवी घेणारे व अमेरिकेतील विद्यापीठातून शिक्षण घेणारे तसेच नागपूर हायकोर्टात वकिली करणारे डॉ. कल्याण कुमार हे चितेगावच्या ग्रामपंचायत निवडणुकीत सदस्य म्हणून निवडून आले आहे. इतके उच्च विद्याविभूषित शिक्षण घेणारे कदाचित जिल्ह्यातील हे पहिलेच ग्रामपंचायत सदस्य आहेत. एल्गार प्रतिष्ठानचे माध्यमातून सामाजिक काम करणारे डॉ. कल्याण कुमार हे चितेगाव ग्रामपंचायतचे मतदार आहेत. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत गावक?यांनी त्यांना अविरोध निवडून देण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे त्यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत सहभाग घेण्याची संमती दिली. मात्र काही राजकीय नेत्यांनी हस्तक्षेप करून निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत ॲड. डॉ. कल्याण कुमार वार्ड नंबर १ मधून निवडणुकी रिंगणात उभे राहिले आणि विजयी झाले.चंद्रपूर जिल्ह्यात येण्यापूर्वी डॉ. कल्याण कुमार हे दिल्ली येथील त्रिमूर्ती भवन मध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणून कार्यरत होते हे येथे उल्लेखनीय.

## उपजिल्हाधिकारी खांडेभराड यांचे करोनामुळे निधन



**गोंदिया** :- येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील भुअर्जन उपजिल्हाधिकारी राहुल खांडेभराड यांचे शुक्रवारला नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरु असतांना दुःखद निधन झाले.त्यांच्यावर शनिवारला नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. गेल्या एक महिन्यापासून ते कोरोनाची लागण झाल्याने नागपूर येथे उपचार घेत होते.तिरोडा उपविभागीय अधिकारी पदाचा पदभार सांभाळतांनाच त्यांना कोरोनाची लागण झाल्याने ते उपचारासाठी रजेवर गेले होते.त्यांच्या आकस्मिक निधनाने एक चांगला युवा अधिकारी गोंदिया जिल्ह्याने गमावला.तर कुटुबियांवरही कमी वयात संकट ओढवले गेले आहे. मनमिळावू आणि ओबीसी युवकांसाठी एक प्रेरणास्त्रोत असे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख होती.ओबीसी युवकासांठी म ार्गदर्शन करण्यासाठी व आपल्या युवकांनी प्रशासकीय सेवेत यावे ही त्यांची भूमिका सातत्याने राहीली.त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## देवरी येथे साडेसोळा किलो गांजा जप्त

**देवरी:** येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात उभ्या असलेल्या एका ट्रकमधून पोलिसांनी १ लाख ३२ हजार २४० रुपये किमतीचा १६ किलो ५३० ग्रॅम गांजा तसेच ट्रक जप्त केला. ही कारवाई १६ जानेवारी रोजी करण्यात आली.देवरी येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात उभ्या असलेल्या ट्रक क. सीजी ०४/ एलआर २२२१ मध्ये गांजा असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलिस अधीक्षक जालींदर नालकुल यांच्या मार्गदर्शनात देवरीचे सहायक पोलिस निरीक्षक अजीत कदम व त्यांच्या पथकाने घटनास्थळ गाठले. यावेळी ट्रकच्या कॅबिनमध्ये ८ पुडक्यांमध्ये १६ किलो ५३० ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजा व ट्रक जप्त केला असून चालकाचा शोध घेत आहे.

## आ.फुके भंडारा गोंदिया जि.प.निवडणुक प्रभारी तर आ.रहागंडाले गोंदियाचे प्रमुख

**गोंदिया/भंडाराः-** येत्या गोंदिया व भंडारा जिल्हा परिषदेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पाटी महाराष्ट्र प्रदेशकडून निवडणुक प्रभारी व प्रमुख जाहिर करण्यात आले.यामध्ये भंडारा गोदिंया जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रभारी म्हणून आमदार डॉ.परिणय फुके यांची निवड करण्यात आली.



तर गोंदिया जिल्हा निवडणुक प्रमुख म्हणून तिरोड्याचे आमदार विजयभाऊ रंहागडाले तर भंडारा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रमुख म्हणून माजी आमदार चरण वाघमारे यांच्या नावाची घोषणा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केली आहे.सोबतच सहप्रभारी म्हणून माजी आमदार बाळा काशीवार व माजी आमदार रमेश कुथे यांचा समावेश करण्यात आला आहे.तर राजेश बांते यांची महाराष्ट्र प्रदेश ओबीसी आघाडीच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

## भांबरे हत्याकांडातील आरोपीवर अनेक गुन्हे

**गोंदिया:** रेतीची तुटलेली पार्टनरशीप आणि रखडलेल्या आर्थिक व्यवहारामुळे शहरातील रिंग रोडवरील एका खासगी रुग्णालयाच्या परिसरात धारदार शस्त्राने वार करुन रविप्रसाद राधेलाल बंभारे (३४ रा. लोधीटोला) याचा १४ जानेवारी रोजी रात्री निर्घृन खून करण्यात आला. हा खून करणारे आरोपी हे अट्ट्ट गुन्हेगार आहेत. मागील सात वर्षापासून ते गुन्हेगारी जगतात असून चौघांवरही गंभीर गुन्हे आहेत.

खून, खूनाचा प्रयत्न,दरोडे, शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ले, घातक हत्यार बाळगणे, गैरकायद्याची मंडळी जमवून हल्ला करणे, चोरी करणे, लुटणे, गंभीर दुखापत करणे, दरोडा घालण्याचे काम त्या आरोपींनी केले. त्या चार आरोपींवर गोंदिया जिल्हा पोलिसांच्या अभिलेखावर तब्बल ३२ गुन्हे दाखल असल्याची बाब पुढे आली आहे. गोंदियाच्या पोस्टमन चौक सरस्वती शाळेजवळ राहणारा आरोपी श्याम उर्फ पीटी रमेश चाचेरे (३२) याच्यावर १२ गुन्हे दाखल आहेत. त्यात चोरीचे तीन, अपहरणाचे दोन, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ले केल्याचे दोन, अवैध दारु विक्रीचे तीन, गंभीर मारहाणीचा एक, तर घातक शस्त्र बाळगल्याप्रकरणी भारतीय हत्यार कायद्यान्वये एक गुन्हा असे १२ गुन्हे दाखल आहेत.



गोंदियाच्या कुंभारटोली येथील दुसरा आरोपी प्रशांत उर्फ छोटा कालू मातादिन ज्ञानेश्वर भालेराव (३०) याच्यावर नऊ गुन्हे दाखल आहेत. त्यात खुनाचा एक गुन्हा, दरोड्याचा एक गुन्हा, विश्वासघात केल्याचा एक गुन्हा, लुटपाटचा एक गुन्हा, घातक हत्यार बाळगल्याप्रकरणी एक गुन्हा, तर गंभीर मारहाणीचे ४ गुन्हे दाखल आहेत.

गोंदियाच्या गौशाला वॉर्डातील शुभम गोपाल चव्हाण उर्फ परदेशी (२९) याच्यावर ८ गुन्हे दाखल आहेत. त्यात चोरी, लुटणे, गंभीर दुखापत, गैरकायद्याची मंडळी जमवून मारहाण करुन धमकी देणे व संशयास्पदीरित्याही तो आढ़ळला होता असे आठ गुन्हे दाखल आहेत. शाहरुख रज्ज़ाक शेख (२३) रा. मदीना मस्जीद मागे गौतमनगर गोंदिया याच्यावर मारहाण, घातकशस्त्र बाळगणे व लुटणे असे तीन गुन्हे दाखल आहेत. या चार आरोपींवर ३२ गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचा तपास केला जात असून यात पुन्हा गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# गोंदियात डॉ.जैन तर तिरोड्यात डॉ.मेश्राम यांना लसीकरणाचा पहिला मान



**गोंदिया :** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार १६ जानेवारीला संपूर्ण देशात कोरोनाचे लसीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार गोंदिया जिल्ह्यात पहिल्या दिवशी तीन केंद्रावर २१३ फ्रंटलाईन वॉरियर्सला लसीकरण करण्यात आले. यासाठी आरोग्य यंत्रणा संपूर्ण सज्ज झाली असून जिल्ह्यात लसीकरणासाठी १० हजार लसींचा पुरवठा करण्यात आला आहे. सर्वप्रथम आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना लसीकरण केले जात असून जिल्ह्यात ८४२८ फ्रंटलाईन वॉरियर्सची यादी तयार करण्यात आली आहे.गोंदियात आज लसीकरणाचा शुभारंभ करण्यात आला,त्यात पहिला मान डॉ.राजेंद्र जैन यांना मिळाला.तर तिरोड्यात डॉ.हिम्मत मेश्राम यांना पहिला मान मिळाला.

१६ जानेवारीला जिल्ह्यातील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया, उपजिल्हा रुग्णालय तिरोडा व ग्रामीण रुग्णालय देवरी येथील लसीकरण केंद्रावर कोविड लसीकरणाचा शुभारंभ करण्यता आला. लसीकरणाची सर्व तयारी आरोग्य विभागाने केली होती. लसीकरण केंद्राच्या ठिकाणी प्रतिक्षा कक्ष, लसीकरण कक्ष व निरिक्षण कक्ष उभारण्यात आले होते. पहिल्या टप्प्यात हेल्थ केअर वर्कर म्हणजे आरोग्य सेवा देणाऱ्यांना लस देण्यात आली. यासाठी लाभार्थ्यांची यादी यापूर्वीच कोविन ॲपवर अपलोड करण्यात आली होती.

शुभारंभाच्या दिवशी जिल्ह्यातील तीन केंद्रावर प्रत्येकी १०० याप्रमाणे ३०० फ्रंटलाईन वारियर्सला लसीकरण करण्याचे उद्दिष्ट होते. लसीकरण झाल्यानंतर ३० मिनिटे त्या रुग्णाला निरिक्षणाखाली ठेवण्यात आले. ज्यांची पोर्टलवर नोंदणी झाली आहे अशांनाच कोरोनाची लस देण्यात आली. सिरम इन्स्टिट्यूट पुणे निर्मित कोविशिल्ड लस घेण्याचा महिला मान डॉ.राजेंद्र जैन यांना मिळाला. सकाळी १०.३० वाजता जगातील सर्वात मोठ्या लसीकरणाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला.

केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालय येथील लसीकरण केंद्रावर जिल्हास्तरीय लसीकरणाचा शुभारंभ सकाळी १०.३० वाजता करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थित डॉ.राजेंद्र जैन यांना कोविशिल्डची पहिली लस देण्यात आली. लसीकरण केंद्रावर केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. लस घेतल्यानंतर डॉक्टरांनी अतिशय सकारात्मक प्रतिक्रीया व्यक्त केल्या. कुठलीही शंका न ठेवता नागरिकांनी येत्या काळात लसीकरण करुन घ्यावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

लसीकरण केंद्रावर आरोग्य कर्मचारी, लसीकरण अधिकारी व पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या लसीकरण केंद्राला आमदार विनोद अग्रवाल व नगराध्यक्ष अशोक इंगळे यांनी भेट दिली व केंद्राची पाहणी केली.तिरोडा रुग्णालयात आमदार विजय रहांगडाले,नगरपरिषद उपाध्यक्ष सुनिल पालांदुरकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

लसीकरणाच्या अभियानाला यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना यांनी निर्देश दिले आहेत. यावेळी अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, अतिरिक्त आरोग्य उपसंचालक डॉ.रवि धकाते, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.संजय पांचाळ, डॉ.वेदप्रकाश चौरागडे, डॉ.सुवर्णा हुबेकर व डॉ.प्रशांत तुरकर उपस्थित होते.

# बेरोजगारांची समस्या शासन दरबारी मांडणार-आ.अँड.वंजारी



**आमगाव:** तालुक्यासह जिल्ह्यात बेरोजगारी ही एक प्रमुख समस्या आहे. रोजगाराअभावी येथील युवक महानगरात जात आहेत. तर अनेक बेरोजगार रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. अशा कोरोना संसर्ग काळात बेरोजगारीत भर पडली आहे. रोजगाराअभावी होणारी भटकंती टाळण्यासाठी आपण बेरोजगाराची समस्या शासन दरबारी मांडणार, असे आश्वासन आ.अँड.अभिजित वंजारी यांनी दिले.

नागपूर पदवीधर मतदार संघातील महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत वंजारी यांचा स्वामी विवेकानंद संकुल परिसरात नागरी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात संबोधित करताना ते बोलत होते. महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व शिक्षक संघाद्वारा तसेच अँड. अभिजित वंजारी मित्र परिवारच्या वतिने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाची अध्यक्षस्थानी म्हाडाचे माजी सभापती नरेश माहेश्वरी होते. तर मंचावर गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष अँड. एन.डी. किरसान, भंडारा जिल्हा को - आपरेटिव बैकचे अध्यक्ष सुनिल फुंडे, नागपुर विभाग शिवसेनेचे संघटक प्रमुख किरण पांडव आदि मान्यवर उपस्थित होते.

त्यानंतर लगेच पत्रपरिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार वंजारी यांनी सांगितले की, विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळविण्यासाठी, पेन्शन योजना लागू करण्यासाठी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार तसेच ग्रामीण भागातील शाळेत क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणार, क्रीडा संकुल उभारण्यासाठी, वाचनालयाना अनुदान मिळेल, याकरिता पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

आमगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष इसुलाल भालेकर यानी नव निर्वाचित आमदार अँड.अभिजीत वंजारी याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी राधाकिसन चुटे, राजीव फुंडे, नरेंद्र कावळे, रितेश अग्रवाल, मुरलीधर करंडे, रेखलाल टेंभरे, विकास शर्मा, महेश मेश्राम उपस्थित होते.

# सायकल रॅलीतून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**गोंदिया:** पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देण्यासाठी राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या माझी वसुंधरा अभियानाच्या जनजागृतीसाठी येथील नगर परिषदेच्यावतीने रविवारी (दि.१७) सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील मुख्य मार्गांनी निघालेल्या या रॅलीत मोठ्या संख्येत नागरिकांनी सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

पृथ्वी, जल,वायु, अग्नी आणि आकाश या पंचतत्वाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी नागरिकांना जागरुक करण्यासाठी राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे माझी वसुंधरा अभियान राबविले जात आहे. २ ऑक्टोबर ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या या अभियानांतर्गत नगर परिषदेच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. या अंतर्गत शहरवासीयांना माझी वसुंधरा या अभियानाबाबत माहिती व्हाणी जेणेकरुन पर्यावरण संवर्धन व संरक्षणात त्यांचा हातभार लागावा या उद्देशातून रविवारी (दि.१७) सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

नगराध्यक्ष अशोक इंगळे व मुख्याधिकारी करण चव्हाण यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखविली. नगराध्यक्ष इंगळे व मुख्याधिकारी चव्हाण यांनी पर्यावरण रक्षणासाठी तसेच आपले आरोग्य जपण्यासाठी नागरिकांनी वाहनांऐवजी सायकलचा जास्तीत-जास्त वापर करावा, असे सांगितले. याप्रसंगी नगर परिषद सदस्य धर्मेश अग्रवाल, सुनील तिवारी, शकील मंसुरी, क्रांती जायस्वाल, हेमलता पतेह, मुजीब पठान, सायकलिंग संडे ग्रुपचे सदस्य, नगर परिषद कर्मचारी व अन्य नागरिक सहभागी झाले होते.

**जयस्तंभ चौकातून रॅलीचा शुभारंभ**

सकाळी ६.३० वाजता येथील जयस्तंभ चौकातून निघालेली रॅली बालाघाट टी-पाईंट, कुडवा नाका, अंडरग्राऊंड राजस्थान स्कूल मार्गाने नगर परिषद कार्यालयात आली. येथे रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांना नगर परिषदेकडून प्रशस्तीपत्र आणि माझी वसुंधरा टी शर्टचे वितरण करण्यात आले.

# राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांची जयंती साजरी



**गोंदिया:** शहरातील शास्त्री वॉर्ड परिसरातील सर्व समाज वर्ग कम्युनिटीच्यावतीने राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिका भागरथा मेश्राम होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नंदा चिरवतकर, गीता खापेकर, करुणा कामत, गर्ल्स कॉलेजमधील प्रा.डॉ. दिशा गेडाम, शिक्षीका माधुरी भेलावे उपस्थित होत्या.

याप्रसंगी डॉ.गेडाम व भेलावे यांनी सामाजिक समता निर्माण करुन प्रत्येक मावळ्यांच्या रक्तात स्वाभिमान भिनवणारी, प्रत्येक मावळ्यात शिवबा बघणारी, मातृत्व व गुरुत्व असणारी कलावंत, शिल्पकार माता जिजाऊ आजच्या प्रत्येक स्त्री समोर एक आदर्श देऊन जाते. जुनाट रुढी परंपरा व चालीरीतींना झुगारून स्त्री शिक्षणाची दारे उघडणाऱ्या सावित्रीबाईंचा गौरव करावा, तेवढा कमीच आहे. फुले दाम्पत्याला घराबाहेर हाकलले तेव्हा फातिमा शेख व त्यांचे बंधू उस्मान शेख यांनी त्यांना राहण्याकरिता जागाच नव्हे तर समोर शिक्षणाची ज्योत तेवत ठेवण्याकरिता सहकार्य केले. स्वत: फातिमा शाळेत शिकवू लागल्या. पहिली मुस्लीम महिला शिक्षणाचा मान फातिमा माऊलीस जातो. अशा या कर्तबगार मातांचे आदर्श उराशी बाळगून स्त्रियांनी वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी कल्पना चव्हाण, मनू उके, गायत्री चिरवतकर, दीपा मेश्राम, नैना अग्रवाल, कुसूम ठाकरे, मंजू चव्हाण, मुस्कान सोमनकर, निपाने, दुर्गा जायस्वाल, गुड्डी वाढई, बांगरे, खडसे, कल्पना मेंढे, भांडारकर, रजनी मेश्राम, क्षीरसागर, खिरेकर, अंजली भोंगाडे, अवनी चिरवतकर, श्रुती अग्रवाल, रानी सैय्यद, डिम्पी भांडारकर, अंकुश क्षीरसागर, सुलभा गोनमोडे, निलू क्षीरसागर, समीर चव्हाण, साक्षी भेलावे, छायांकी भेलावे, ओबीसी संघर्ष कृती समिती कोषाध्यक्ष कैलास भेलावे, संविधान मैत्री संघ संयोजक अतुल सतदेवे यांनी सहकार्य केले.

# कोरोना नियंत्रणविषयक नियमांचे पालन करुन ग्रामसभा पूर्ववत सुरु करण्यास संमती-ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई :** सोशल डिस्टन्सिंग आणि कोविड १९ च्या अनुषंगाने निर्गमित विविध मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना पूर्वीप्रमाणे ग्रामसभांचे आयोजन करण्यास संमती देण्यात येत आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

ग्रामविकास मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) च्या कलम ७ नुसार प्रत्येक वित्तीय वर्षात निदान चार ग्रामसभांचे आयोजन करणे बंधनकारक आहे. अशाप्रकारे ग्रामसभेचे आयोजन न केल्यास संबंधित सरपंच, उपसरपंच, आणि ग्रामसेवक यांना जबाबदार धरून त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करणेची तरतूद आहे. तथापि, कोरोना विषाणूच्या प्रस-ारास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश, अधिसूचना यानुसार सर्व प्रकारच्या सामाजिक, राजकीय सभा व संमेलनांवर बंदी घालण्यात आली होती. त्याचप्रमाणे ग्रामसभा घेण्यास तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती देण्यात आली होती. तथापि, सद्यस्थितीत कोविडच्या अनुषंगाने लॉकडाऊन काळातील निर्बंधांमध्ये शिथिलता येत असून बहुतांश जनजीवन पूर्ववत होत असल्याने ग्रामसभांच्या आयोजनास देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत आहे. यासंदर्भातील शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे, असेही श्री.मुश्रीफ यांनी सांगितले.

ग्रामविकासात ग्राम पंचायतीच्या ग्रामसभांना असलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता ग्रामसभांचे पूवीप्रमाणे आयोजन होणे गरजेचे आहे. कोरोना नियंत्रणासाठीच्या सर्व नियमांचे पालन करुन ग्रामसभा पूर्ववत सुरु करण्यास संमती देण्यात येत असल्याचे मंत्री श्री.मुश्रीफ यांनी सांगितले.

## अभियांत्रिकीच्या जागांमध्ये सहा लाखांनी घट

**गोंदिया:** अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊनही बेरोजगारीचा सामना करावा लागत असल्याने गेल्या काही वर्षांत अभियांत्रिकीला वाईट दिवस आले आहेत. गेल्या पाच वर्षांत देशातील अभियांत्रिकीच्या सहा लाखांवर जागा घटल्याचे वास्तव समोर आले आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरुवातीला देशात अभियांत्रिकी महाविद्यालयांचे पीक आले. प्रवेशासाठी चक्क रांगा लागायच्या. नोकरीची हमी आणि अभियंत्यांना असलेली प्रतिष्ठा बघून अनेक विद्यार्थी या अभ्यासक्रमाकडे वळायचे. मात्र, गेल्या पाच वर्षांत अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊनही अनेक विद्यार्थी बँक, स्पर्धा परीक्षा व अन्य नोकरीचा पर्याय निवडत आहेत. अभियांत्रिकी पदवीच्या भरवशावर नोकरी मिळवणाऱ्यांची संख्याही कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी इकडे पाठ फिरवली आहे. याचा परिणाम प्रवे-शावर झाल्याने महाविद्यालयांनी गेल्या पाच वर्षांत जागा कमी करण्याचे ठरवले. यातूनच २०२०-२१ या वर्षांपर्यंत अभियांत्रिकी शाखेतील ६ लाख ५५ हजार ३९६ जागा घटल्या आहेत. विशेष म्हणजे, पाच वर्षांपूवी देशातील तीस लाखांवर असलेल्या जागा थेट २४ लाखांवर आलेल्या आहेत.

# अवैध दारु अड्यावर तिरोडा पोलिसांची कारवाई

**तिरोडा** पोलिसांनी मागील १५ दिवसांपासून अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध कारवाईचे सत्र सुरु केले आहे. या अंतर्गत जवळपास ७० लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ग्राम निवडणुकीच्या मतमोजणीच्या पूर्व संध्येला ६ ठिकाणी छापामार कारवाई करून १० लाख ६४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. एकंदरीत तिरोडा तालुक्यात अवैध दारू विक्रेत्यांचे तिरोडा पोलिसांच्या कारवाईमुळे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

तिरोडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार योगेश पारधी यांनी कारभार सांभाळताच अवैध दारूविक्रेत्यांविरुद्ध कारवाईचा सत्र सुरू केला आहे. १७ जानेवारीच्या रात्री पोलिस पथकाने ६ अवैध दारू विक्रेत्यांच्या घरी छापामार कारवाई केली. दरम्यान तरासन बरयीकर यांच्याघरून १९२० किलो सडवा मोहफूल असा एकूण १ लाख ५९ हजार ६०० रुपया किंमतीचा मुद्देमाल, शिला खरोले हिच्या घरून १४४७ किलो मोहफुल यासह १ लाख १५ हजार २०० रुपया किंमतीचा मुद्देमाल, वनमाला झाडे हिच्या घरून २१६० किलो सडवा मोहफूलासह १ लाख ७२ हजार ८००, शामराव झाडेच्या घरून १२८० किलो सडवा मोहफुलासह १ लाख १७ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल, कलीम गफूर पठान यांच्या घरून ३२४० किलो सडवा मोहफुलासह २ लाख ५९ हजार २०० रुपये किंमतीचे तसेच साबीर पठान यांच्या घरून ३ हजार ८० किलो सडवा मोहफुलासह २ लाख ४६ हजार ४०० रुपया किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकंदरीत सहा कारवाईमध्ये १० लाख ६४ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व आरोपींविरुद्ध तिरोडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन यादाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. योगेश पारधी, सपोनि. हनवते, पोउपनि. राधा लाटे, पो.हवा. दामले, चेटुले, श्रीरामे, बर्वे, वाढवे, मडावी, पंकज सवालाखे, चोपकर, प्रशांत कहालकर, गुड्डू हरिणखेडे यांनी केली.

## वर्ष अभियांत्रिकीच्या घटलेल्या जागा

| | |
|---|---|
| २०१५-१६ | ३०,९३,४२६ |
| २०१६-१७ | २९,९९,१३८ |
| २०१७-१८ | २५,७०,६८८ |
| २०१८-१९ | २७,११,८७८ |
| २०१९-२० | २५,४१,१५२ |
| २०२०-२१ | २४,४०,०३० |

# स्टाफ सिलेक्शन कमिशन संयुक्त पदवी स्तर परीक्षा २०२०

एकूण जागा : ६५०६
पदाचे नाव :

**गट ब**

१. सहायक लेखापरीक्षण अधिकारी (असिस्टंट ऑडिट ऑफिसर)
२. सहायक लेखा अधिकारी (असिस्टंट अकाउंट्स ऑफिसर)
३. सहायक कक्ष अधिकारी (असिस्टंट सेक्शन ऑफिसर)
४. सहायक (असिस्टंट)
६. आयकर निरीक्षक
७. निरीक्षक
८. सहायक सक्तवसुली अधिकारी (असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर)
९. उपनिरीक्षक (सब इंस्पेक्टर)
१०. सहायक/ अधीक्षक (असिस्टंट/ सुपरिंटेंडेंट)
११. विभागीय लेखापाल (डिविजनल अकाउंटंट)
१२. उपनिरीक्षक (सब इन्स्पेक्टर)
१३. कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी

**गट क**

१४. लेखा परीक्षक (ऑडिटर)
१५. लेखापाल (अकाउंटेंट)
१६. कनिष्ठ लेखापाल (ज्युनियर अकाउंटंट)
१७. वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८. कर सहाय्यक
१९. उपनिरीक्षक (सब इन्स्पेक्टर)

शैक्षणिक पात्रता : कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी : पदवी व बारावीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
उर्वरित पदे : कोणत्याही शाखेतील पदवी.
परीक्षा शुल्क - : सर्वसाधारण/ इतर मागासवर्ग : ? १००/- SC/ST/PWD/ExSM/ महिला: फी नाहीं
परीक्षेचे वेळापत्रक
ढळशी-ख : २९ मे ते ७ जून २०२१
ढळशी-खख : नंतर सूचित केले जाईल.
ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख : ३१ जानेवारी २०२१
जाहिरात सविस्तर वाचण्यासाठी : https: //bit.ly/3ilEB2a
ऑनलाईन अर्ज करण्यासाठी : http:// ssc.nic.in

## पदाचे नाव - स्टाफ कार ड्रायव्हर (सामान्य श्रेणी)

एकूण पदे - १२
शैक्षणिक पात्रता : १० वी उत्तीर्ण. जड व हलके वाहनचालक परवाना.
होमगार्ड किंवा तत्सम कामाचा किमान ३ वर्षे अनुभव असल्यास प्राधान्य.
वयोमर्यादा : १० मार्च २०२१ रोजी कमाल २७ वर्षे डिउ/ड्ढ ५ वर्षे सूट, जइउ: ३ वर्षे सूटें
अर्ज पाठविण्याचा पत्ता : वरिष्ठ व्यवस्थापक, मेल मोटर सर्व्हिस, १३४-अ, ड.घ. अहिरे मार्ग, वरळी, मुंबई- ४०००१८
अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख : १० मार्च २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत)
अधिकृत वेबसाईट : http:// www.indiapost.gov.in

# परराज्यातून आलेला ५४२ क्विंटल धान जप्त



मोहाडीः- परप्रांतातील धान आयातीवर बंदी असतानाही अधिक पैसा कमविण्याच्या लालसेने आलेला ५४२ क्विंटल धान मोहाडी तालुक्यातील मांडेसर येथे एका भातगिरणीजवळ सुरू असलेल्या मोहाडी खरेदी विक्री सहकारी संस्थेच्या शासकीय धान खरेदी उपकेंद्रात जप्त करण्यात आला . ही कारवाई मोहाडीच्या नवनियुक्त तहसीलदार (आयएएस) मीनल करणवाल व त्यांच्या चमुने केली. याप्रकरणी मोहाडी पोलिसानी सहा जणांवर गुन्हा दाखल केला असून दोन्ही ट्रक धानासह पोलिस स्टेशनमध्ये जमा केले आहेत.

मोहाडी तालुक्यात धान केंद्र सुरू झाले तेव्हापासून सर्वच धान केंद्रावर परप्रांतातून आणलेला धान खरेदी करणे सुरू आहे. मात्र संबधीत अधिकारी कारवाई करीत नाही. मोहाडीच्या कर्तव्यदक्ष महिला तहसीलदार यांनी प्रथमच तालुक्यात ही पहिली कारवाई केली आहे. मादोनीस जयनुल आपदीन रा. रंगोली उत्तरप्रदेश, रशीदअली शायदअली रा. कानपुर या दोन ट्रक चालकांसह मोहाडी खरेदी-विक्री सहकारी संस्थेचा कर्मचारी राकेश दत्तू पोटफोडे आणि सौराज भातगिरणीचे मालक बालचंद दमाहे व ईतर दोन यांच्याविरुद्ध मोहाडी पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. दोन आरोपींचे नाव कळू शकले नाही.

राज्यात धानाला अ ग्रेड - १८८८ रुपये , ब ग्रेड - १८६८ रुपये प्रती क्विंटल व ७०० रुपये बोनस मिळत असल्याने धान माफियांकडुन परप्रांतातील धान प्रति क्विंटल १७०० रुपयेप्रमाणे मोठया प्रमाणात जिल्ह्यात आणला जात आहे. या धानाला राज्यात बंदी करण्यात आली आहे. असे असतानाही दोन ट्रकमधून ५४० क्विंटल धान (किंमत ९ लक्ष ४२३ रुपये) मोहाडी तालुक्यातील मांडेसर येथील मोहाडी खरेदी-विक्री सहकारी संस्थेच्या आधारभूत धान खरेदी उपकेंद्रावर विक्रीसाठी आणण्यात आला होता. हा प्रकार तहसीलदार व पोलिस विभागाच्या लक्षात येताच ट्रक जप्त करुन मोहाडी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक थेरे करीत आहेत. या प्रकरणात अधिक तपास केल्यास मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे. या घटनेनंतरही दररोज परराज्यातून मोठया प्रमाणात धान आधारभूत धान खरेदी केंद्रावर येत आहे. याकडे जिल्हा पणन विभागाचे पूर्णत: दुर्लक्ष होत आहे.


# महाराष्ट्र शासन
# कृषि विभाग
# उप विभागीय कृषि अधिकारी, गोंदिया यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता: तालुका बिज गुणन प्रक्षेत्र, पोलीस मुख्यालयाचा बाजूला, कारंजा ता.गोंदिया जि. गोंदिया**

**ई-मेल :** gondia_sdao@rediffmail.com

## ई निविदा सुचना क्र.बी-१/०६/उ.वि.कृ.अ.गों/सनः २०२०-२१

उपविभागीय कृषि अधिकारी, गोंदिया मृद व जलसंधारणाच्या कामांसाठी सार्वजनीक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गोंदिया यांचेकडील मंजुर सहकारी संस्था वर्गातील नोंदणीकृत संस्थाकडून खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. वर नमुद केल्याप्रमाणे गोंदिया जिल्ह्यातील कंत्राटदारच सदरच्या निविदा स्पर्धामध्ये सहभागी होऊ शकतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. उपरोक्त वेबसाईटवर दि. १९/०१/२०२१ पासून कोरे निविदा संच विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | कामांची बयाना रक्कम (१ टक्के) | कोरे निविदा प्रपत्राची किंमत रुपये (वस्तु व सेवाकर) | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | भात खाचर दुरुस्ती मौजा सोनेखारी गट क्र.१/१ ते १/२ आणि मौजा येडमाकोट गट क्र.१/१ ते १/६ ता. तिरोडा जि.गोंदिया | १८,५१,२६४/- | १८५१३/- | ५९० | ५ मार्च,२०२१ |

**अटी व शर्ती**

१) सदर ई-निविदेच्या अटी व शर्ती व निविदेची सर्व कार्यवाही व शुद्धीपत्र महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम (सर्वसाधारण) सन २०२०-२१ या योजनेअंतर्गत कार्यारंभ आदेश देण्यात येईल.
३) ऑनलाईन ई-निविदा प्रपत्र विक्री व स्विकृती दिनांक १९/०१/२०२१ पासून किंवा तदनंतर महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
४) अटी शर्तीमध्ये बदल करण्याचा किंवा कोणताही कारण न दर्शविता संपूर्ण ई-निविदा रद्द करण्याचा अधिकार निवड समितीकडे राखून ठेवले आहेत.

**(बी.एल.पाटील)**
**उपविभागीय कृषि अधिकारी, गोंदिया**